

क्रिकेट कसे खेळावे?

लेखक—माधव मंत्री - वसंत पोरेडी

REFBK-0011477

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २३५७

मराठी ग्रंथ सं... ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक ....१३५८.... नों: दि: ....

११४६८

REFBK-0011477
REFBK-0011477

क्रिकेट कसें खेळावें ?

लेखक
माधव मंत्री
वसंत पोरेड़ी

मूल्य – दोन रुपये
प्रथमावृत्ति – १९६१

प्रकाशक : वि. र. बाम
रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४.

मुद्रक : ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय, ५५१ बुधवार, पुणें २.

अनुक्रम ३७६२५ वि: क्रिडा
क्रमांक ७३८६० नों: दि: २५/७/

अनुक्रमणिका

१ मैदानावर उतरण्यापूर्वी
२ चला आतां मैदानावर
३ बॅट धरण्याची व उभें राहाण्याची पद्धत
४ फलंदाजीचे दोन भाग
५ गोलंदाजी कशी टाकावी ?
६ क्षेत्ररक्षण : एक अत्यंत महत्त्वाचें अंग
७ यष्टिरक्षण
८ क्रिकेटरनें काय करावें ? काय करूं नये ?
९ धांवा काढण्याची कला (रनिंग बिट्वीन दि विकेट्स्)
१०. चला सामना खेळायला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक .... नों: दि: ....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 97866

१

मैदानावर उतरण्यापूर्वी

क्रिकेट कसें खेळावें हें मी ओघाओघानें सांगणारच आहें. पण त्यापूर्वी क्रिकेटच्या सरंजामाविषयीं ' चार युक्तीच्या गोष्टी ' सांगणें आवश्यक आहे. बॅट, बॉल, स्टंप्स्, बूट, पायमोजे, पॅड्स्, काउंटी कॅप् या सर्व चिजा आवश्यक आहेत. बॉल्, स्टंप्स्, पॅड्स् वगैरे वस्तू क्रिकेट संघाच्या मालकीच्या असतात. पण बॅट, बूट वगैरे प्रत्येक भावी क्रिकेटरनें स्वतःच निवडायच्या असतात.

एकाद्या गाजलेल्या क्रिकेटपटूनं पसंत केलेली बॅट कोणालाहि चालूं शकेल असा एक समज आपल्याकडे आहे. यांत थोडेंसें तथ्य आहे. बॅटीचें लाकूड कसें आहे, तें कितपत टिकाऊ आहे हें एकादा चांगला क्रिकेटर सांगूं शकेल. पण कोणती बॅट तुम्ही सहज पेलूं शकाल, कोणत्या बॅटीनें तुम्ही लीलेनें फटके मारूं शकाल हें तो कसें सांगूं शकेल ? म्हणून आपल्याला पेलेल व आवडेल अशी बॅट आपण स्वतःच पसंत केली पाहिजे. फलंदाजीच्या पूर्वतयारींत बॅटीची निवड ही एक महत्त्वाची पायरी आहे. माझ्या स्वतःच्या

बॅटी मी अशाच निवडल्या आहेत. माझ्या संघांतील खेळाडू माझी ही निवड पाहून, खूष होतात आणि म्हणतात. " अशी झक्क बॅट असली म्हणजे काय ? धांवांची बरसात झालीच पाहिजे ! अशा बॅटींनी आम्हीहि तुमच्यासारखे धांवांचे डोंगर उभे करूं ! "

ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी त्यांनी स्वतःची बॅट बाळगावी. स्वतःच्या बॅटीनं खेळण्यांत हाडाच्या क्रिकेटरला जें अनुपम सुख वाटतं तें त्याला इतर कशांतहि वाटत नाहीं. स्वतःची बॅट असली म्हणजे आपण तिला पोटच्या पोराप्रमाणें जपतों ! आपल्या मुलांची काळजी घ्यावी तशी बॅटींची निगा राखणारे कितीतरी खेळाडू मला माहीत आहेत.

बॅटीची निगा राखायची म्हणजे काय करायचें बुवा, असें तुम्ही विचाराल. फलंदाजी केल्यावर बॅटीवर चेंडूचे लाल डाग उठतात. शून्य नंबराच्या सँडपेपरनं ते डाग प्रथम काढून टाकायचे. बॅट कोरडी झाली असेल तर त्यावर ' रॉ लिन्सीड ऑइल 'चा एक हलका हात फिरवायचा. बॅटीला तेल लावायचं म्हणजे बॅट तेलांत बुचकळून काढायची असा पुष्कळ लोकांचा गैरसमज आहे. बॅटीला तेल चोपडत तासन्तास बसलेले कांहीं अजब लोक मी पाहिले आहेत. पण तें चुकीचें आहे. आठवडयांतून एकदां बॅटीला तेलाचा पातळसा थर दिला कीं बस्स ! अशा रीतीनें निगा राखलेल्या बॅटीनें खेळणें व अस्वच्छ बॅटीनें खेळणें यांत मोठा फरक आहे.

आपण सारेच कांहीं विजय मर्चंट अगर हनीफ महंमद नसतों. त्यांच्यासारखे असामान्य फलंदाज खेळतात तेव्हां चेंडू त्यांच्या बॅटीच्या मध्यभागींच आदळत असतो. पण तुम्ही आम्ही खेळतांना बॅटीच्या कडांनींच बहुतेक चेंडू खेळत असतों. साहजिकच बॅटीच्या कडांना बारिक चिरा पडतात. अशा वेळीं त्या जागीं ' स्टिकिंग् प्लॅस्टर ' (चिकटपट्टी) लावल्यास काम भागतें आणि बॅट बरेच दिवस तग धरूं शकते.

आतां आपण बॅट निवडली. नंतर बुटाची निवड करणें फारसें कठीण

नाहीं. तयार बूट घेण्यापेक्षां मोच्याकडून करवून घेणें जास्त श्रेयस्कर. बूट फार घट्ट नसावेत. पाय बुटांत व्यवस्थितपणें राहातील, घट्टपणामुळं दुखावणार नाहींत याची दक्षता घ्यावी. आपल्याकडील क्रीडांगणें कठीण असल्यामुळें पायांवर बराच दाब पडल्यानें पाय दुखूं लागतात. म्हणून 'डनलॉपिलो' किंवा स्पंज यांचा 'इन्सोल' बुटांत असेल तर फारच चांगलें. बॅट निवडतांना जसें, ती आपणास सहज पेलत येते किंवा नाहीं हाच महत्त्वाचा मुद्दा असतो त्याचप्रमाणें बूट घालून आपणास क्रीडांगणावर सहज संचार करतां येईल किंवा नाहीं याच गोष्टीचा विचार करायचा असतो. बुटांच्या तळानां व बाजूंवर टोकेरी खिळे लावून घ्यावेत.

सुती पायमोज्यांपेक्षां लोकरीचे जाड मोजें केव्हांहि जास्त चांगले, पण ते सर्वांनाच परवडणार नाहींत. म्हणून एकावर एक असे दोन सुती लांब मोजे घालायला हरकत नाहीं. मात्र हे मोजे वारंवार धुवून अगदीं स्वच्छ ठेवले पाहिजेत. नाहींतर घामट मोज्यांनी दुर्गंधी तर पसरेलच, पण आपल्या पायांना चामडीचे रोग होण्याचा धोका बळावेल !

आपल्याकडील उष्ण हवेंत आपण सर्वसाधारणपणें पांढरे कपडेच वापरतों. हे कपडे नेहेमीं स्वच्छ ठेवावेत. पांढरी शुभ्र शर्ट–पँट, नुकतीच साफ केलेली, उन्हांत लखलख तळपणारी बॅट, पायांना बिलकुल त्रास न देणारे बूट आणि स्वच्छ मोजे...हा सारा जामानिमा एकदां करून तर पहा...तुम्हाला वाटेल, आपण अब्बास अल्ली बेगच आहोंत !

पॅड्स, ग्लोव्हज् वगैरेंवर जास्त कांहीं लिहिण्याची आवश्यकता नाहीं. कारण, त्या वस्तू क्लबच्या मालकीच्या असतात. पॅडस्ना सफेदी चांगली लावलेली असली म्हणजे खेळणारा व बघणारा, दोघांनाहि कसें प्रसन्न वाटतें. पॅड्सचे पट्टे बांधल्यावर नीट खोंवावेत. या सर्व गोष्टी अगदीं क्षुल्लक आहेत असें कोणी म्हणेल. पण ज्याला उत्तम क्रिकेटर व्हायचं असेल त्यानें या सर्व गोष्टींना योग्य तें महत्त्व दिलेंच पाहिजे.



पिच्

२

चला आतां मैदानावर

फलंदाजी

क्रिकेट खेळायची पूर्वतयारी तर झाली. आतां चला मैदानावर. ' प्रॅक्टिस् नेट्'मध्यें शिरण्यापूर्वी तुम्हांला ' युक्तीच्या चार गोष्टी ' सांगायच्या आहेत. चांगला फलंदाज होण्यासाठीं तीन महत्त्वाच्या गोष्टी अंगीं बाणल्या पाहिजेत. त्या गोष्टी म्हणजे फूटवर्क (पायांची हालचाल), मनाची एकाग्रता आणि चेंडूवर सतत नजर. बॅट धरण्याची तुमची पद्धत, फटके मारण्याची तुमची शैली कशीहि असो, फूटवर्क बरोबर असलें कीं ५० टक्के लढाई तुम्हीं जिंकलीच असें समजा ! फूटवर्क म्हणजे पुढें सरसावून किंवा मागें सरकून गोलंदाजी खेळतांना आपले पाय चेंडूच्या रेषेंत आणणें. या कामीं जितकें यश तुम्हीं मिळवूं शकाल त्या प्रमाणांत तुम्हास हवा त्या प्रकारचा फटका तुम्हीं मारूं शकाल. तुम्ही आजवर कित्येक अव्वल प्रतीचे क्रिकेटपटू

पाहिले असतील. उदाहरणार्थ, विजय मर्चंट, विजय हजारे, हनीफ महंमद इत्यादि. या अतिरथी–महारथींचा खेळ पहातांना एक गोष्ट आपल्या नजरेंत विशेष भरते आणि ती म्हणजे त्यांचें फूटवर्क.

[टेकिंग गार्ड



मिडल   मिडल अँड लेग   लेग

भारतांतील कडक खेळ पट्टयांवर (हार्ड विकेट्स्) कमींतकमी फूटवर्कनेंहि धांवा करतां येतात. पण फलंदाजाची खरी कसोटी वा परीक्षा असते 'टर्निग विकेट्स्'वर किंवा इंग्लंडमधील विकेट्स्वर. अशा प्रकारच्या विकेट्स्वर चेंडू सतत कांहींतरी चमत्कार करून फलंदाजाला चकवीत असतो, बनवीत असतो. त्याची त्रेधा तिरपीट उडवीत असतो. अशा खटयाळ व खोडकर खेळ–पट्टीवर खेळतांना फूटवर्कचा अत्यंत उपयोग होतो. ज्याच्यापाशीं फूटवर्क नसेल तो हमखास अयशस्वी होतोच होतो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनाची एकाग्रता. मनाच्या एकाग्रतेविना कोणतीच गोष्ट साध्य होत नाहीं हा आपला नेहमींचा अनुभव. मत्स्यवेध करणाऱ्या धनुर्धर अर्जुनाला मत्स्यनेत्राखेरीज दुसरें कांहींएक दिसत नव्हतें. एवढी कमालीची एकाग्रता साध्य करण्याचा प्रत्येक फलंदाजानें प्रयत्न केला

क्रमांक .... ता. दि. ....

पाहिजे. गोलंदाजाच्या हाताची चेंडूवरील पकड (ग्रिप्) आणि त्याच्या हातून सुटून फलंदाजाकडे येणारा तो लालभडक चेंडू यांवरच फलंदाजाचें सारें लक्ष खिळून राहिलें पाहिजे. आपल्यापैकीं पुष्कळजण एकाद्या सामन्यांत तीसचाळीस धांवा सहज करतात. पण त्यांची मजल त्यापुढें क्वचित्च जाते. याचें कारण त्यांच्या मनाची एकाग्रता त्यानंतर टिकून राहात नाहीं! दोन-दोनशें–तीनतीनशें धांवा पूर्ण होईपर्यंत ही एकाग्रता टिकवून धरणें ही एक प्रकारची उग्र व खडतर तपश्चर्याच म्हटली पाहिजे. डॉन् ब्रॅडमन्, मर्चंट, हजारे, हनीफ आदि थोडया फलंदाजांनाच ही कला वा तपस्या साध्य झाली आहे.

वेस्ट इंडीज्चा सध्यांचा कर्णधार फ्रॅंक वॉरेल मला एकदां म्हणाला होता कीं, " भारतांतील फलंदाज चांगले खेळतात पण त्याच्यापैकीं बहुतेकजण तीसचाळीस धांवांच्या असपास बाद होतात. याचें कारण म्हणजे ते स्वतःला ' सेट' झालों आहोंत असें समजतात आणि उतावळेपणानें फटके मारायचा प्रयत्न करतात." हाच त्यांच्यांतील आणि अत्युत्कृष्ट खेळाडूंमधील फरक.

ह्या विधानाची प्रचीति नुकत्याच झालेल्या भारत–पाकिस्तान कसोटी सामन्यांत आली. हनीफ महंमद व सईद अहंमद खेळत होते. सईद चांगलाच खेळत होता. पण चाळीस पन्नास धांवांच्या सुमारास तो धोकेबाज फटके मारूं लागला. त्यानें एकदां सोपा झेलहि दिला. अर्थात त्याला जीवदान मिळालें ही गोष्ट अलाहिदा! त्याच्याच बरोबर खेळणारा हनीफ किती सावधान चित्तानें खेळत होता! कुठें घाई नाहीं, धांदल नाहीं कीं गडबड नाहीं. प्रत्येक चेंडूचा तो त्याच्या 'गुणा'प्रमाणें समाचार घेत होता. चोपायला लायक असे चेंडू तो बरोबर आणि सडकून चोपीत होता. एक अत्युत्कृष्ट खेळाडू व एक चांगला खेळाडू यांजमधील फरक म्हणतात तो हाच.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे चेंडूवर सतत नजर. प्रत्येक गोलंदाज स्वतःची अशी एक पद्धत बांधीत असतो. त्या पद्धतीची आपण माहिती करून घेतली कीं त्या गोलंदाजीस तोंड द्यायला आपण पूर्णपणें तयार होतों.

गोलंदाज कशा प्रकारचा चेंडू टाकणार आहे हें त्याच्या हाताच्या पकडीवरून साधारणपणें समजतें. म्हणून त्याच्या हाताच्या पकडीकडे बारकाईनें लक्ष देणें आवश्यक आहे. सर्वसाधारण मध्यमगति गोलंदाजांची गोष्ट सोडून द्या, पण याचा फायदा मंदगति व गुगली गोलंदाज यांच्याविरुद्ध खेळतांना मिळूं शकतो. फलंदाजाची नजर गोलंदाजाच्या हातावर खिळलेली असली म्हणजे गुगली चेंडू टाकीत असतांना त्याच्या हाताच्या हालचालींत होणारा बदल फलंदाजास चटकन् टिपतां येतो.

माझें स्वतःचेंच उदाहरण देतों. मी प्रथम गुगली गोलंदाजी खेळूं लागलों तेव्हां मी चांगलाच हबकलों होतों. पण सारा धीर एकवटून मी काळजीपूर्वक त्या गोलंदाजाच्या हाताच्या पकडीकडे नजर केंद्रित केली. दोन तीन लेग्ब्रेक् खेळल्यावर चौथा चेंडू टाकतांना मला त्याच्या पद्धतींत बदल झालेला दिसला. मी मनांत म्हटलें, हा लेग् ब्रेक् नाहीं, मग हा गुगली तर नव्हे ? आणि खरोखरच तो गुगली होता ! त्या दिवसापासून गुगली अचूक ओळखण्यांत मी बहुधा कधींच चूक केली नाहीं. सांगायचा मुद्दा असा कीं, गोलंदाजानें चेंडू टाकतांना 'स्टार्ट' घेतल्यापासून ते तो चेंडू टाकीपर्यंत त्याच्या हातावर आपली घारीसारखी सतत तीक्ष्ण नजर असली पाहिजे. पण जरा थांबा. एवढ्यानेंहि संपलं नाहीं. तो चेंडू पिच्वर आपटून आपल्या बॅटीजवळ येईपर्यंत त्यावरील आपली नजर बिलकुल चळतां अगर ढळतां कामा नये ! असें केल्यानें चेंडू कशीं फिरकी घेत आहे तेंहि आपण नजरेनें टिपूं शकतों. आणि तो चेंडू कसा खेळावा याची आपली तयारी होऊं शकते. गोलंदाजाच्या हातून सुटलेल्या चेंडूची शिवणदेखील सुविख्यात क्रिकेटपटू रणजी यांना दिसूं शके असें म्हणतात. उगाच नाहीं रणजींनी एक असामान्य क्रिकेटपटू म्हणून जगभर लौकिक संपादन केला.

३

बॅट धरण्याची व उभें राहण्याची पद्धत

आधीं सांगितलेल्या सर्व गोष्टी नीट लक्षांत ठेवून आतां 'प्रक्टिस नेट्' मध्यें पाऊल टाका. हां, एकदम खेळायला सुरवात नाहीं करायची! बॅट कशी धरायची याचेंहि एक शास्त्र आहे. यालाच इंग्रजींत 'ग्रिप्' असें म्हणतात. तुमची ग्रिप् कशी आहे यावर तुमच्या खेळाचें भवितव्य अवलंबून आहे असें मी म्हणालों तर त्यांत तुम्हांला कदाचित् अतिशयोक्तीचा वास येईल. पण तसा गैरसमज करून घेऊं नका! दुलीपसिंहजींनीं एकदां एका खेळाडूची ग्रिप् पाहिली आणि ते म्हणाले, "ह्यानें आपली 'ग्रिप्' बदलली नाहीं तर हा पुढें फारसा चमकणार नाहीं." त्यांची भविष्यवाणी अगदीं खरी ठरली. आज त्या गोष्टीस सात वर्षे झालीं. त्या युवकानें आपल्या खेळांत अद्याप विशेष प्रगति दाखविलेली नाहीं.

ग्रिप्

आदर्श 'ग्रिप' कोणती या विषयीं बरेच मतभेद आहेत. बॅटीच्या वरच्या भागाजवळ दोन्ही हात जवळ जवळ ठेवणें ही कांहींच्या मतें चांगली ग्रिप्, तर कांहींजण म्हणतात, बॅटीच्या हॅंडलच्या मध्यावर दोन्ही हात जवळ जवळ ठेवणें ही आदर्श ग्रिप्. तें कांहीं असलें तरी मुख्य गोष्ट म्हणजे दोन्ही हात जवळजवळ असले पाहिजेत. एक हात हॅंडलच्या वरच्या टोकाला व दुसरा हात हॅंडलच्या बुंध्याला अशी ग्रिप् कधींच असूं नये.

मीं लहान असतांना एका सुप्रसिद्ध खेळाडूनें बॅट धरण्याची एक पद्धत मला सांगितली होती. अगदीं कॉमन सेन्स पद्धत आहे ती. आणि म्हणून ती येथें देत आहें. क्रिकेटचा श्रीगणेशा गिरवूं इच्छिणाऱ्या मुलापुढें एक बॅट जमिनी–वर पालथी ठेवावी. बॅटीचें वरचें टोंक त्या मुलाच्या पायाशीं असावें. नंतर, खालीं वाकून दोन्ही हातांनीं त्याला ती बॅट उचलायला सांगावी. त्याला सांगा-यचें, " या बॅटीनं आतां लगेच तुला खेळायचं आहे. " त्यावेळीं त्याची जी ग्रिप् असेल तीच बहुधा त्याला हवी असलेली आदर्श ग्रिप् ! . . .

दोन्ही हात हँडलच्या जवळजवळ ठेवले तर ‘ ड्राइव्हज् ’ करायला त्याचा फार उपयोग होईल. एक हात हँडलच्या वरच्या टोकास व दुसरा हात बुंध्यापाशीं अशी ग्रिप् घेतली तर उत्तम प्रकारें ‘ बचाव ’ (डिफेन्स) करतां येतो आणि विकेटच्या मागील बाजूस जाणारे फटकेहि मारतां येतात. पण या ग्रिप्‌नें ‘ ड्राइव्हिंग ’ जमणार नाहीं. म्हणून या दोन पद्धतींचा सुवर्णमध्य साधणारी ग्रिप् माझ्या मतें आदर्श ठरते. वरचा हात आणि हँडलचें वरचें टोंक यांत साधारणतः एक इंच जागा असावी.

उजव्या हाताची पकड ‘ व्ही ’ या इंग्रजी अक्षरासारखी (V Shape) असावी. ती बहुधा तशी असतेहि. पण डाव्या हाताची पकड निरनिराळ्या फलंदाजांत निरनिराळ्या प्रकारची असते. कांहींजणांच्या डाव्या हाताचें मन-गट गोलंदाजाकडे ‘ पहात ’ असतें. हीच पद्धत साधारणतः बरोबर समजली जाते. पण डॉन ब्रॅडमन्, डेनिस् कॉम्प्टन इत्यादि जगप्रसिद्ध खेळाडूंचीं मनगटें गोलंदाजाकडे ‘ पहात ’ (‘ फेस ’ करीत) नसत. पण या विषयीं कांटेकोर असे कांहींच नियम नाहींत. जी पकड आपणास सोयीची वाटेल तीच आपण स्वीकारावी. गैरसोयीच्या वाटणाऱ्या पकडीनें तुम्ही धांवा कशा करूं शकाल ?

फलंदाजीचा पवित्रा

फलंदाजीच्या पवित्र्याला इंग्रजींत ‘ स्टॅन्स् ’ असें म्हणतात. ही पद्धत देखील प्रत्येकाच्या सोयीवर अवलंबून असते. आपलें शरीर दोन पायांवर बरोबर ‘ बॅलन्स ’ होईल असा पवित्रा घेतला पाहिजे. म्हणजे आपल्या शरी-राचें वजन दोन्ही पायांवर सारखें विभागलें जाईल. दोन्ही पाय अगदीं चिक-टून न ठेवतां त्यांत थोडें अंतर ठेवावें. पवित्रा घेतांना मागील पाय ‘ क्रीज् ’ च्या जरा आंत व ‘ क्रीज् ’ला समांतर असा ठेवावा. पुढचा पाय क्रीज्‌च्या पुढें

फलंदाजीचा पवित्रा

थोडयाशा अंतरावर आणि समांतर असलेला बरा. पण जरा तिरका असला तरी चालेल. मी स्वतः पवित्रा घेतांना, पुढच्या पायाचा तळवा जमिनीवर टेकतों आणि बुटाचा वरचा भाग अधांतरीं ठेवतों. पण गोलंदाज धांवत येऊं लागला कीं माझ्या बूटाचा वरचा भाग जमिनीवर टेकतों आणि दोन्ही बूट एकमेकांस समांतर होतात. अर्थात तांत्रिक दृष्टीनें पहातां ही कांहीं निर्दोष पद्धत नव्हे. पण सुविख्यात क्रिकेटपटू डॉ. डब्ल्यू. जी. ग्रेस, जॅक् हॉब्स् आणि आपले प्रोफेसर दि. ब. देवधर यांचा पवित्रा असाच, माझ्यासारखा असे. अगदीं परवापरवापर्यंत पॉली उम्रीगर देखील असाच पवित्रा घेत असे, पण अलीकडे त्यानें ती पद्धत बदलली आहे.

वर जो पवित्रा सांगितला आहे त्यामुळें फलंदाजास आक्रमक अगर बचावात्मक असा कोणत्याहि प्रकारचा फटका मारतां येतो. म्हणजे असें कीं चेंडू कुठें पडणार आणि तो तसा वळणार हें चटकन कळून त्या प्रमाणें फटका मारण्यासाठीं पवित्रा घेण्यास त्याला अवसर मिळतो.

' दोन डोळयांचा पवित्रा '

फलंदाजीच्या पवित्र्याचा आणखी एक प्रकार आहे. त्यास ' दोन डोळयांचा पवित्रा ' (' टू आईड स्टान्स ') असें म्हणतात. या पद्धतींत फलंदाजाचे दोन्ही डोळे व छाती गोलंदाजाच्या अगदीं समोरासमोर असतात. अनेक फलंदाज हा चुकीचा पवित्रा घेतात. प्रख्यात अिंग्रज फलंदाज जॉन लँग्रिज या पवित्र्यानें खेळून पुष्कळ धांवा करीत असे. या पवित्र्यामुळें ऑफ-कडील ' ड्राइव्हिंग ' कच्चें राहतें. कारण ऑफ ड्राइव्ह मारण्यासाठीं योग्य ' पोझिशन ' घेण्यास त्या फलंदाजाला वेळ लागतो. विकेटच्या सर्व बाजूंना फटके मारतां येणें हें ध्येय प्रत्येक शिकाऊ फलंदाजानें डोळयासमोर ठेवलें पाहिजे. आणि म्हणूनच हा खेळ शिकतांना, वर प्रथम सांगितलेला पवित्रा प्रत्येक शिकाऊ फलंदाजानें आत्मसात करावा.

पण हें करतांना कोणाचेंहि अंधानुकरण करूं नये. ऑस्ट्रेलियाचा भूत-पूर्व कर्णधार लिंड्से हॅसेट हा बुटका असूनहि फलंदाजी करतांना ताठ उभा राही. पण म्हणून एकादा उंच मुलगाहि तसा उभा राहून ' हॅसेट ' होण्याचा प्रयत्न करूं लागला तर त्याचें हसेंच होईल ! याच्या उलट हनीफ महंमद किंवा गुलाबराव रामचंद अगदीं वांकून (क्राउचिंग स्टान्स्) उभा राहतो म्हणून आपणहि तसा प्रयत्न केला तर कंबर दुखूं लागेल ! सारांश, फलं-दाजी करतांना अगदीं सहजपणें खेळतां येईल असाच पवित्रा घेतला पाहिजे.

४

फलंदाजीचे दोन भाग

फलंदाजीचे दोन भाग असतात. एक संरक्षण किंवा बचाव व दुसरा आक्रमक (अटॅक). त्यांत आणखी दोन विभाग आहेत. ते म्हणजे पुढच्या पायावर जोर देऊन मारलेले फटके व मागच्या पायावर जोर देऊन मारलेले फटके.

बॅटीचा 'बॅक् लिफ्ट्'

अनुभवी क्रिकेट–शिक्षकांच्या मतें, कोणताहि फटका मारण्यापूर्वी फलंदाज बॅट मागें उचलतो. (यालाच बॅक् लिफ्ट म्हणतात) तो लिफ्ट महत्त्वाचा असतो. हा लिफ्ट सरळ रेषेंत असला पाहिजे, म्हणजे चेंडू खेळतांना आपली बॅट सरळ राहील, यांत शंकाच नाहीं. पण प्रत्यक्षांत काय होतें तें पहा. डॉ. डब्ल्यू. जी. ग्रेसपासून ते थेट डॉन ब्रॅडमन, फ्रँक वॉरल व गॅरी सोबर्सपर्यंत कोणाचीहि बॅट सरळ रेषेंत मागून पुढें येत नाहीं. ती बॅट स्लिप्स्'च्या दिशेनें येते. कोणाची बॅट थर्ड स्लिप्च्या दिशेनें येते तर कोणाची

थोडीशी जास्त सरळ रेषेंत म्हणजे फर्स्ट स्लिपच्या दिशेनें येते. हें बरोबरच आहे. कारण क्रिकेटमध्यें कांहीं फटके असे आहेत कीं जे मारावयास बॅटीचा लिफ्ट थोडासा स्लिप्स्च्या दिशेनेंच यावयास पाहिजे.

हा लिफ्ट किती उंचावरून यावा याबाबत दुमत आहे. पण तो लिफ्ट फार उंचावरून नसावा याविषयीं मात्र एकमत आहे. लिफ्ट जितका मोठा तितका बॅटीस खालीं यावयास वेळ लागणार. अतिशय वेगवान् गोलंदाजीवर खेळतांना बॅटीचा लिफ्ट् जितका कमी तितकें चांगलें. कारण तो चेंडू फलंदाजापाशीं अतिशय वेगानें येत असतो. बचावात्मक फलंदाजी करतांनाची ही गोष्ट.

आक्रमक फलंदाजी करतांना बॅटीचा लिफ्ट असावाच असावा. कारण त्या लिफ्ट्मुळेंच फटक्यांत जोर येतो. साधारणतः मी या बाबतींत अमुक एक नियम घालून देऊं शकत नाहीं. प्रत्येक फलंदाजानें स्वतःच्या सोयीनुसार हा ‘ बॅक् लिफ्ट् ’ घ्यावा हेंच बरें.

‘ बॅक् डिफेन्स ’

बॅक् डिफेन्स म्हणजे काय ? यांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे उजवा पाय शक्य तितका मागें न्यावा. सरळ मागें न घेतां थोडासा तिरका मागें घ्यावा आणि मग डावा पाय उजव्या पायाजवळ आणावा. (फलंदाज उजव्या हातानें खेळणारा असल्यास त्यानें असें करावें. तो डावरा असल्यास याच्या अगदीं उलट करावें.) उजवा पाय चेंडूच्या सरळ रेषेंत व डावा पाय तोल राखण्यासाठीं उजव्याजवळ असल्यामुळें तीनहि स्टंप्स् झांकल्या जातात. मी पुष्कळ असे फलंदाज पाहिले आहेत (यांत शाळा कॉलेजांतील खेळांडूंचाच भरणा अधिक आहे) कीं जे उजवा पाय सरळच्या सरळ मागें नेतात आणि

बॅक् डिफॅस

स्टंप्स् उघडया ठेवतात. हें अगदीं चूक आहे. कारण बॅट ही संरक्षणाची पहिली फळी मानली तर पाय ही दुसरी फळी मानली पाहिजे. म्हणूनच 'बॅक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८६५

डिफेन्स ' करतांना उजवा पाय तिरपा (अॅक्रॉस) गेला पाहिजे. ही झाली पायांची हालचाल. उजवा पाय मागें नेत असतांनाच उजवा हात बॅटीच्या हॅंडलच्या खालच्या बाजूस आला पाहिजे. त्याची पकड घट्ट असली पाहिजे. डावा हात हॅंडलच्या वरच्या बाजूस जाऊन, चेंडूवर झेल न उडता चेंडू खालीं राहील या गोष्टीचें नियंत्रण करतो. या गोष्टीस खूपच महत्त्व आहे. तसें नियंत्रण न राहिल्यास जवळच्याच क्षेत्ररक्षकाच्या हातीं आयताच झेल जाईल !

सरळ बॅटीनें खेळणें (म्हणजेच खेळतांना बॅट सरळ ठेवणें) हें क्रिकेटचें मूलभूत तत्त्व आहे. आणि म्हणूनच प्रत्येक क्रिकेट–शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर पुढील महत्त्वाचा धडा बिंबण्याचा प्रयत्न करीत असतो:- ' डिफेन्स अगेन्स्ट दि ब्रेक अँड अटॅक विथ दि स्ट्रोक. ' हा धडा नीट लक्षांत ठेवूनच आपणास पुढील धडे गिरवायचे आहेत.

चेंडू सरळ रेषेंत आला तर प्रश्नच उरत नाहीं. बॅट आपोपाप सरळ जाईल. पण चेंडचा ऑफ ब्रेक किंवा लेग् ब्रेक असला तर ? उत्तर अगदीं सोपें आहे चेंडूचा टप पडून तो ज्या दिशेनें आपल्याकडे येतो आहे त्या दिशेच्या विरुद्ध दिशेनें त्या चेंडूला सरळ बॅट दाखवायची. समजा, ऑफ् ब्रेक चेंडू आहे. हवेंतून येतांना हा चेंडू ज्या दिशेनें येतो त्याप्रमाणें ' डिरेक्शन ' (दिशा) न घेतां हा चेंडू चटकन् आपल्या अंगाकडे वळतो. ज्या दिशेनें हवेंतून चेंडू आला ज्या दिशेनें जर आपण सरळ बॅट दाखवली तर तो चेंडू बॅटीच्या आंतील कडेस लागून लेग् स्लिप्मध्यें झेल जाण्याचा संभव असतो. पण तेंच जर चेंडू ज्या दिशेस वळणार आहे त्या दिशेनें त्याला आपण सरळ बॅट दाखवली तर तो चेंडू बॅटीच्या मध्यभागीं आपटेल आणि डाव्या हाताच्या कौशल्यानें तो तेथेंच खालीं पडेल. याच पद्धतीनें लेग ब्रेकला तोंड दिले पाहिजे. नाहींतर बॅटीच्या बाहेरील कडेस चेंडू चाटून जाऊन स्लिप्मध्यें झेल जाण्याची शक्यता असते.

चेंडूचे टप्पे



१ यॉर्कर २ लाँग हॉप ३ फुल टॉस ४ हाफ व्हॉली ५ गुड लेंग्थ्

‘फॉरवर्ड डिफेन्स्’

चेंडू जेव्हां ‘ गुड् लेंग्थ्’च्या पुढें आणि स्टंपांच्यामध्यें किंवा जरा आसपास पडतो तेव्हां ‘ फॉरवर्ड डिफेन्स्’ करणें आवश्यक असते. कोणत्या चेंडूवर किती पुढें जाऊन खेळावें हें प्रत्येक फलंदाजाच्या आंवाक्यावर अवलंबून आहे. चेंडूचा ‘स्पिन्’ (फिरत) किंवा ‘ स्विंग ’ जागच्या जागीं नाहींसा करण्यास याचा उपयोग होतो. आपण जितके पुढें जाऊन खेळूं तितका स्पिनचा अगर स्विंगचा कोन (अँगल) कमी होईल. हा फटका कसा मारावा तें आतां आपण पाहूं. प्रथम डावा पाय पुढें टाकायचा. असें करतांना सबंध शरिराचा तोल पुढें गेला पाहिजे. डावा पाय गुडघ्यांत थोडा वाकला पाहिजे.



फॉरवर्ड डिफेन्स

फॉरवर्ड डिफेन्स

हा पाय चेंडूच्या रेषेंत पुढें न्यायचा असतो. याचवेळीं काळजी घेण्याची गोष्ट अशी कीं मागचा उजवा पाय 'क्रीज'मध्यें भक्कम राहिला पाहिजे. पुष्कळदां असें होतें कीं चेंडूचा स्पिन अगर स्विंग आपण नष्ट करूं शकत नाहीं. त्यावेळीं तोल जाऊन मागचा उजवा पाय उचलला गेला कीं आपण विटी-चीच (स्टंप्ड) होतों ! या फटक्यांत उजवा हात बॅटीच्या हॅंडलच्या खालीं येतो पण त्याची पकड सैल ठेवावी लागते. म्हणजे चेंडू जरी बॅटीच्या कडेस लागला तरी त्याचा स्लिपपर्यंत झेल जाऊं शकत नाहीं. डावा हात हॅंडलच्या अगदीं वर असावा. कांहीं जणांच्या मतें मनगटाचा पाठचा भाग हॅंडलच्या पुढें असावा तर इतर कांहींच्या मतें हा भाग हॅंडलच्या मागें असावा.यांत महत्वाची गोष्ट म्हणजे बॅट सरळ (Perpendicular) असली पाहिजे आणि बॅट व पॅड्स् यांत फट बिलकुल असतां कामा नये. तसेंच, डोकें पुढें व खालीं राहिलें पाहिजे. या फटक्यांत डाव्या हाताचें काम महत्वाचें आहे. डावा हात बॅटीवर घट्ट पकड ठेवून व हॅंडल खालीं ठेवून बॅटीचा 'फॉलो थ्रू' शक्य तितका कमी ठेंवतो आणि झेल उडण्याचा संभव कमी करतो.

प्रत्येक फलंदाजास 'डिफेन्स' हा आवश्यक असतो आणि म्हणूनच प्रत्येकानें 'डिफेन्स' मजबूत केला पाहिजे. पायांची व हातांची हालचाल व 'पोझिशन' बरोबर येण्यासाठीं सतत सराव आवश्यक आहे सरावामुळें या सर्व हालचाली अगदीं बिनचूक होऊं लागतात. आणि खेळतांना आपणांस त्यांची जाणीवहि होत नाहीं.

आपण योग्य रीतीनें 'फॉरवर्ड' अगर 'बॅक डिफेन्स' करतों आहोंत किंवा नाहीं ह्याचें प्रात्यक्षिक आपण स्वतः एकाद्या मोठ्या आरशासमोर उभें राहून पहावें. हें शक्य नसल्यास क्रिकेट–शिक्षक किंवा अनुभवी खेळाडू यांच्या नजरेखालीं या फटक्यांची सतत प्रॅक्टिस करावी. या दोनहि फटक्यां-वर प्रभुत्व मिळाल्याशिवाय 'उत्कृष्ट फलंदाज' तयार होत नाहीं. अमुक अमुक फलंदाज हा आक्रमक खेळाडू (अटॅकिंग् बॅट्स्मन) आहे असें आपण म्हणतों तेव्हां ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याचा 'बचावाचा

खेळ'हि (डिफेन्स) उत्तमच असतो. उत्कृष्ट डिफेन्सशिवाय फलंदाज विकेट-वर जास्त वेळ टिकाव धरूं शकणार नाहीं.

स्क्वेअर कट् आणि लेट कट्

ऑफ स्टंपाच्या बाहेर असलेल्या व आंखूड टप्प्याच्या चेंडूवर स्क्वेअर कट् व लेट कट् हे फटके मारण्यांत येतात. शक्यतों मध्यमगति व लेग ब्रेक गोलंदाजीवर हे फटके मारावेत. शीघ्रगति अगर तुफानी गोलंदाजीवर असले फटके मारण्यांत थोडा धोका आहे. चेंडूच्या तीव्र वेगामुळें ते फटके 'मिस् टाइम' होण्याचा संभव असतो. तसेंच, ऑफ् स्पिन गोलंदाजीवर स्क्वेअर कट् मारण्याचा प्रयत्न करूं नये.

स्क्वेअर कट् मारतांना उजवा पाय ऑफ् स्टंपाच्या रेषेपलीकडे टाकून बॅट अडवी धरून चेंडूवर अशा रीतीनें हाणावी कीं चेंडू भुईसरपट जाऊन झेल उडणार नाहीं. 'हाणावी' हा शब्द मी मुद्दाम वापरला आहे. कारण हा फटका मारतांना बॅट जोरांतच हाणली पाहिजे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलें शरीर चेंडूच्या शक्य तितक्या जवळ असावें. तें तसें नसेल तर बॅट चेंडूवर वरून खालीं येण्याऐवजीं त्याच्या खालून येईल आणि स्लिप्-मध्यें झेल उडेल.

'लेट कट' हा क्रिकेटमधील अत्यंत नाजूक, नजाकतदार व प्रेक्षणीय फटका आहे. स्क्वेअर कट्प्रमाणेंच आंखूड टप्प्याच्या व ऑफ स्टंपाबाहेरील चेंडूवर तो मारण्यांत येतो. 'गली' व 'पॉइंट' यांच्या दिशेनें स्क्वेअर कट् मारण्यांत येते तर लेट कट् ही स्लिप्समधून मारण्यांत येते. म्हणून ती जास्त अवघड व धोक्याची असते. लेट कट्साठीं चेंडू नुसता आंखूड टप्प्याचा असून चालत नाहीं तर त्याची 'उशी' (बाउन्स) कमी असावी लागते. लेट कट् मारतांनाहि उजवा पाय ऑफ् स्टंपाच्या रेषेपलीकडे जातो आणि बॅटीच्या फटक्यानें चेंडू जमिनीवर आपटला जातो. या फटक्यांत जास्त जोर वापरावा लागत नाहीं. चेंडूच्या वेगामुळेंच तो सीमापार जातो. फलंदाजानें त्या चेंडूस

स्लिपमधून नुसती दिशा द्यावयाची असते. आणि तसें करतांना चेंडू जमिनी-सरपटत ठेवायचा असतो. म्हणजेंच आपल्या मनगटाची ताकद वापरायची असते. सबंध हाताची नव्हे. आपले जगप्रसिद्ध खेळाडू विजय मर्चंट अतिशय सुरेख सफाईदार लेट कट् मारीत असत. ते हा फटका एवढ्या जोरानें मारीत कीं फटका मारून झाल्यावरच त्यांची बॅट जमिनीवर आपटत असे. तसेंच, चुकून यष्टिरक्षकाचे ग्लेव्हज् मध्यें आले तर त्या बॅटीचा फटका त्या ग्लेव्हजवर बसे ! [हा फटका इतका लेट (उशीरा) मारायचा असतो कीं चेंडू यष्टिरक्षकाच्या जवळ जवळ हातांत गेलेला असतो.]

‘हूक’ आणि ‘पुल्’

क्रिकेट खेळतांना किंवा क्रिकेटची कॉमेंट्री ऐकतांना ‘हूक’ व ‘पुल्’ हे शब्द पुष्कळ वेळां कानावर येतात. या दोन फटक्यांत फरक काय या विषयीं तज्ज्ञांत एकमत नाहीं. सर डोनाल्ड ब्रॅडमन यांना आपण याबाबतींत ‘अधिकारी’ मानूंया आणि ते काय म्हणतात तें बघूंया. ते म्हणतात कीं, ‘हूक हा फटका, स्टंप्सवर अगर लेग साइडवर शीघ्रगति आणि आंखूड टप्प्याच्या चेंडूवर मारायचा असतो. हा फटका मारतांना फलंदाज, चेंडूच्या फ्लाइटच्या रेषेचे आंत येतो आणि फटका, स्क्वेअर लेग आणि फाइन लेग या भागांत मारण्यांत येतो. तसेंच, ‘पुल्’ मारतांना, स्टंपांवर किंवा ऑफ स्टंपाबाहेर पडलेला चेंडू फलंदाज आडव्या बॅटीनें मिडविकेट भागांत जवळ जवळ ओढून काढतो. स्लो लेग्ब्रेक किंवा मध्यमगति गोलंदाजीवर हा ‘पुल्’ फटका मारण्यांत येतो.

‘हूक’ मारतांना फलंदाजानें शक्य तों लवकर म्हणज गोलंदाजानें आंखूड टप्प्याचा ‘बाउन्सर’ टाकल्याबरोबर आपला उजवा पाय मागें आणि स्टंपांच्या पलीकडे नेला पाहिजे. यांतील मुख्य कल्पना अशी कीं जो चेंडू हिरवळीवर आपटून त्याच्या डोक्यावर येत असतो तो या पवित्र्यामुळें त्याच्या डाव्या बाजूनें सरळ जातो. या पवित्र्याचे दोन फायदे असतात.

पहिला फायदा असा कीं फलंदाज ' चपलचरणीं (क्विक फूटेड) असेल तर या चेंडूवर हूक मारणें त्यास सोपें पडेल. दुसरा फायदा असा कीं त्या चेंडूवर कसलाच फटका मारायचा नाहीं असें ठरविलें तरी त्यास तो चेंडू सुरळीतपणें सोडावयास मिळतो. तसें करतांना त्याच्या शरिरास कसलीच इजा होत नाहीं आणि जवळच्या क्षेत्ररक्षकांना झेल मिळण्याचीहि शक्यता नसते. हा फटका मारतांना उजवा पाय ऑफ स्टंपावर येतो आणि पिव्हट (Pivot) बनतो. बॅटीची व चेंडूची गांठ पडते तेव्हां व नंतर शरीर एक अर्धवर्तुळ करते. आणखी लक्षांत ठेवायची गोष्ट म्हणजे फलंदाजानें चेंडूवरची नजर चळूं देऊं नये. खालीं वाकून चेंडू डोक्यावरून जाऊं देण्याचें फलंदाजानें ठरविलें तरी चेंडूवरची नजर काढून घेऊं नये. त्यामुळें चेडूची उंची अजमावतां येईल आणि त्याप्रमाणें खालीं वाकतां (यालाच ' डक' करणें म्हणतात) येईल.

या फटक्याविषयीं चर्चा करतांना एकदां सुविख्यात क्रिकेटपटू कै. दुलीपसिंहजी मला म्हणाले होते कीं, " हा फटका नियंत्रित करायला कठीण आहे. हा फटका मारतांना झेल उडण्याचा संभव असतो. म्हणून साधारण फलंदाजानें हा फटका न मारणें हेंच उत्तम. " पण ते स्वतः प्रत्येक-वेळीं हा फटका मारीत. कारण एकदा पवित्रा घेतल्यावर तो फटका न मारणें त्यांना जमत नसे. इंग्लंडचे सलामीचे खेळाडू सट्क्लिफ आणि वॉश-बुक यांचा हा आवडता फटका होता. ते या फटक्यावर पुष्कळदां बाद होत, पण तो फटका मारण्याचें त्यांनीं सोडलें नाहीं. या फटक्यांनी त्यांनीं शेकडों धांवा केल्या होत्या.

' पुल् ' करतांना फलंदाजानें हुकप्रमाणेंच पवित्रा घ्यावा. म्हणजे उजवा पाय ऑफ स्टंपाच्या दिशेनें मागें नेऊन आडव्या बॅटीनें हा फटका स्क्वेअर लेग व मिडऑन् मध्यें मारावयाचा. सरळ बॅटीनें हा फटका मारतांच येणार नाहीं. मात्र चेंडू शक्य तों भुईसरपटत मारावा. आंखूड टप्प्याच्या चेंडूवरच हा फटका मारावा. ' ओव्हरपिच्ड ' चेंडूवर हे फटके मारणें आत्म-

घातकी ठरेल. स्लो लेग ब्रेक गोलंदाजी व मध्यमगति गोलंदाजी (जींत चेंडू, कंबर किंवा पोट एवढ्या उंचीवरून फलंदाकडे येत असतो) यांवर हा फटका उपयुक्त ठरतो. आडव्या बॅटीनें मारला जाणारा हा फटका फार धोक्याचा आहे. कारण स्टंपांवर जाणाऱ्या चेंडूवर हा फटका मारण्यांत येतो. फटका चुकला कीं फलंदाज बाद हें ठरलेंच ! म्हणून चांगलें फूटवर्क (पदलालित्य) आणि तीक्ष्ण नजर यांची या फटक्यासाठीं आवश्यकता असते. नेटमध्यें या फटक्याचा चांगला सराव करून नंतरच तो सामन्यांत मारावा.

मागील पायावर भर देऊन मारावयाचा फटका

याच फटक्याला इंग्रजींत 'ऑफ दि बॅक फूट' असें नांव आहे. बॅक डिफन्स पद्धतीनेंच हा खेळावयाचा असतो. फरक एवढाच कीं हा फटका जोरदार असतो आणि त्यांत उजव्या पायाची जागा जरा वेगळी असते. हा फटका मारतांना उजवा पाय सरळ मागें न्यावा. डावा हात हा 'गाइड' म्हणून वापरला जातो आणि उजवा हात फटक्यास जोर देतो. साधारणतः हा फटका कव्हरपासून मिडऑनपर्यंत करतां येतो. ज्या चेंडूवर 'पुल' करतां येत नाहीं आणि जो चेंडू 'ओव्हर पिच्ड' नसतो त्या चेंडूवर हा फटका प्रभावीपणें मारतां येतो. पुलप्रमाणें या फटक्यांतहि धोका आहेच. चेंडूचा टप्पा, फिरकी आणि उशी समजण्यांत जराशी चूक झाली तर त्रिफळा उडण्याचा किंवा स्लिप्स्मध्यें झेल उडण्याचा धोका असतो. ज्याला हा फटका मारतां येत नाहीं त्याला प्रत्येक पल्लेदार चेंडूस मागें जाऊन बचावात्मक खेळावें लागतें. या फटक्यावर ताबा मिळविला म्हणजे जलद धांवा जमवणें सोपें जातें.

'दि ड्राइव्ह'

क्रिकेटमधील सर्वांत सुरेख व आकर्षक अशा फटक्याकडे आतां आपण वळूं या. कोणत्याहि खेळाडूनें योग्य वेळ साधून ड्राइव्ह मारलेला आपण पाहिला कीं, "अरे लव्हली शॉट" असे शब्द आपल्या तोंडून सहजगत्या

बाहेर पडतात. फुलटॉस, हाफ व्हॉली किंवा ओव्हरपिच्ड चेंडू यांवर हा फटका मारावा. दोनहि हात जवळ जवळ असावेत. त्यामुळें या फटक्यास बळकटी येते. तसेंच बॅटीचा 'बॅक लिफ्ट'–जो फॉर्वर्ड डिफेन्समध्यें जवळ जवळ नसतोच–जास्त असावा. फटका मारल्यावर 'फॉलो थ्रू'नें बॅट डाव्या खांद्यावर आली पाहिजे. डावा पाय शक्य तों पुढें व चेंडूच्या अगदीं जवळ गेला पाहिजें. फटका मारायला सुरुवात करतांना म्हणजे डावा पाय पुढें जात असतांना डावा खांदाहि पुढें गेला पाहिजे. बॅटीची व चेंडूची गांठ पडतांना शरिराचें सारें वजन पुढच्या पायावर असलें पाहिजे आणि सबंध शरिराचा तोल राखण्यासाठीं पाय गुडघ्यांत वांकला पाहिजे. आणखी महत्त्वाची गोष्ट

ड्राइव्ह

म्हणजे डोकें वर नसावें–ज्याला इंग्रजींत 'हेड डाउन' म्हणतात त्याप्रमाणें सबंध शरीर पुढें वांकले पाहिजे. मागील पाय क्रीजमागें चवड्यावर पण घट्ट असला पाहिजे. नाहींतर फटका हुकल्यावर तोल जाऊन विटीचीत होण्याची भीति असते. मी पाहिलेले बरेचसे होतकरू खेळाडू मागील पाय पुढें ओढतात (ड्रॅग करतात) त्यांनीं हा दोष जरूर टाळावा.

ड्राइव्ह

ड्राइव्हचे तीन मुख्य प्रकार आहेत :–कव्हर ड्राइव्ह, ऑफ ड्राइव्ह व ऑन् ड्राइव्ह. ऑफ स्टंपबाहेरील Half volley चेंडूवर 'कव्हर' ड्राइव्ह मारावा. पण वर सांगितल्याप्रमाणें डावा पाय शक्य तेवढा चेंडूपाशीं

त्यावा. नाहींतर स्लिपमध्यें झेल उडेल. हा फटका ' ओपन फेस ऑफ बॅट'नें करावयाचा असतो. जराशीं चूक झाली तरी चेंडू बॅटीच्या कडेस चाटून स्लिपवर झेल जातो.

ऑफ स्टंप व मधला स्टंप यांवर येणाऱ्या पल्लेदार चेंडूवर 'ऑफ ड्राइव्ह' मारावा. मधला व लेग स्टंप यांवर येणाऱ्या चेंडूवर 'ऑन् ड्राइव्ह'चा फटका हाणावा. ऑफ ड्राइव्हला बॅट सरळ असावी. ऑन ड्राइव्ह करतांना बॅटीचें 'तोंड' चेंडूवर खालीं भिडवावें. असें केल्यानें फलंदाजास हवी तशी दिशा चेंडूस देतां येते.

प्रत्येक ड्राइव्हमध्यें बॅट सरळ (Perpendicular) असावी आणि बॅटीची पात कधींहि हॅंडलच्यापुढें असतां कामा नये–अर्थात् बॅट व चेंडू यांची गांठ पडण्याआधीं व पडतांना. याला एक अपवाद आहे. तो म्हणजे फलंदाज जेव्हां मुद्दाम उंच (लॉफ्टेड) ड्राइव्ह मारतो तेव्हां. प्रत्येक ड्राइव्हला जोरदार 'फॉलो थ्रू' असावा आणि पुढचा पाय प्रत्येक वेळीं चेंडूच्या जवळ असावा हें मी वर सांगितलेंच आहे.

जलदगति व मध्यमगति गोलंदाजीवर साधारणपणें क्रीजमध्यें राहूनच 'ड्राइव्ह' मारावे. मंदगति गोलंदाजीवर पुढें जाऊन ड्राइव्ह करायला हरकत नाहीं. खरें सांगायचें म्हणजे मंदगति गोलंदाजी खेळण्याचा तोच चांगला मार्ग आहे. जो चेंडू पल्लेदार पडला असता त्यावरच पुढें जाऊन फलंदाजानें त्याची हाफ व्हॉली अगर फुल टॉस करून ड्राइव्ह मारला तर गोलंदाजाच्या हिंमतीस जबरदस्त तडाखा बसतो ! हें सर्व करतांना एक गोष्ट सतत लक्षांत ठेवावी. ती म्हणजे 'अगेन्स्ट दि स्पिन' ड्राइव्ह न मारतां 'विथ दि स्पिन' तो फटका मारावा. ऑफ स्पिन् गोलंदाजीस ऑन् ड्राइव्ह मारणें जसें जास्त श्रेयस्कर तसेंच लेग स्पिन गोलंदाजीस ऑफ ड्राइव्ह व कव्हर ड्राइव्ह करणें जास्त चांगलें व सुरक्षित. स्विंगर्सनाहि हीच गोष्ट लागू आहे. पण सलामीच्या फलंदाजांनीं स्विंगर्सवर ड्राइव्ह करण्याचा प्रयत्न न करतां 'पुशेस्' करणेंच हितावह ठरेल.

' लेग् ग्लान्सेस् '

फलंदाजीमधील एक आकर्षक फटका असें ' लेग ग्लान्स्'चें यथायोग्य वर्णन करतां येईल. दोन प्रकारांनीं म्हणजे मागील पायावर भर देऊन व पुढील पायावर भर देऊन हा फटका मारतां येतो. पहिल्या प्रकारचा फटका मारतांना शरीर डावीकडे वळतें. त्यावेळीं हा उजवा पाय ' Pivot ' बनतो. बॅटीस चेंडूचा स्पर्श होतेवेळीं बॅट डाव्या पायाच्या रेषेंत पण थोडीशी पुढें असावी. याचा एक फायदा असा कीं जरी ' स्निक ' (ओझरता स्पर्श) लागली तरी त्या चेंडूचा यष्टिरक्षकाकडे झेल न जातां चेंडू त्या डाव्या पायावर आपटून खालीं पडेल. डाव्या हातानें बॅट सरळ ठेवावी. बॅटीचे हॅंडल ब्लेडच्या जरा पुढें खालीं वाकलेलें असावें. त्यामुळें चेंडू जमिनीवरून सरपटत जाण्यास मदत होते. याच वेळीं उजव्या हातानें बॅट लेगकडे वळविली जाते. ज्या बाजूस फटका मारायचा असेल त्याप्रमाणें ' अँगल ' (कोन) असेल. उदाहणार्थ, चेंडू ' स्क्वेअर लेग'कडे मारायचा असेल तर बॅटीची ब्लेड गोलंदाजास जवळ जवळ संपूर्ण दिसेल. पण तोच फटका ' फाइन लेग'ला मारायचा असेल तर गोलंदाजास ¾ ब्लेड दिसणारच नाहीं.

पुढील पायावर जोर देऊन ' ग्लान्स ' करतांना पुढचा पाय शक्य तितका चेंडूपाशीं न्यावा. डोकें व खांदे शरिराच्या पुढें झुकलेले असावेत. बाकीचें सर्व तंत्र वरील परिच्छेदांत सांगितल्याप्रमाणेंच. मागील पायावर भर देऊन ' ग्लान्स् ' करतांना चेंडू, लेगस्टंपच्या जरा बाहेर पण जरा कमी पल्लेदार (शॉर्ट ऑफ ए लेंग्थ) असावा. पुढील पायावर जोर देऊन हा फटका मारतांना चेंडू ' हाफ व्हॉली ' अगर शक्य तितका ' ओव्हरपिच्ड ' असावा.

' स्वीप '

पुढचा पाय शक्य तितका पुढें टेकून आडव्या बॅटीनें लेगकडे चेंडू टोलवायचा याला ' स्वीप ' म्हणतात. आडवा झाडू मारावा तसा हा फटका

दिसतो म्हणून पुष्कळ लोक गमतीनें या फटक्यास 'झाडू' हें नांव देतात. हा फटका मारतांना पुढील दोन गोष्टी लक्षांत ठेवाव्यात :—स्टंप व चेंडू यांच्या रेषेंत पुढचा पाय असला पाहिजे. फटका चुकला तर चेंडू बरोबर पायावर आदळला पाहिजे. नाहींतर पायापाठीमागून विकेट जाण्याचा धोका असतो. दुसरी गोष्ट म्हणजे फटका शक्य तों भुईसरपट मारला पाहिजे. यासाठीं बॅट आडवी पाहिजेच. फटका मारतांना बॅट वरून खालीं फिरविली तर चेंडू जमिनीलगत राहील. (यालाच इंग्रजींत 'रोलिंग दि रिस्ट्स् ओव्हर' असें म्हणतात.) विशेषतः लेग ब्रेकला 'स्वीप' मारतांना हीं गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. हा फटका 'अगेंन्स्ट दि ब्रेक' मारण्यांत येतो. म्हणून चेंडू बॅटीच्या वरच्या बाजूस लागला तर चेंडूचा उंच झेल उडण्याचा धोका असतो.

मुख्यतः मंद लेग् ब्रेक् गोलंदाजीवर हा फटका मारण्यांत येतो. कारण तो गोलंदाज आपले लेग् ब्रेक्स बहुधा लेग् स्टंपवर अगर त्या स्टंपच्या जरा बाहेर 'ओव्हर पिच्ड' असे टाकतो. ऑफ ब्रेक गोलंदाजीवरहि हा फटका मारतां येतो. पुष्कळ वेळां बचावाचा खेळ करतांना बॅटीच्या कडेस चेंडू लागून शॉर्ट लेगवरील क्षेत्ररक्षकाकड झेल जातो. अशा वेळीं थोडा बेडरपणा दाखवून हा फटका लगावला तर शॉर्ट लेग क्षेत्ररक्षकाच्या मनांत धडकी भरल्याशिवाय राहात नाहीं. गोलंदाजीच्या पल्ल्यावरहि त्याचा परिणाम होतो. शिवाय फलंदाजाजवळ असलेले क्षेत्ररक्षकहि त्यामुळें जरा दूर हटण्याचा संभव असतो.

५

गोलंदाजी कशी टाकावी ?

गोलंदाजीचे तीन मुख्य प्रकार आहेतः—(१) द्रुतगति किंवा तुफानी, (२) मध्यमगति आणि (३) मंदगति. आपण कोणत्या प्रकारची गोलंदाजी करायची हें ज्याचें त्यानेंच ठरवायचें असतें. पण आपण ज्या प्रकारचे गोलंदाज बनणार त्या प्रकारास अनुकूल अशी आपली शरीरयष्टि, स्टॅमिना (दम) वगैरे आहे किंवा नाहीं याचाहि जरूर विचार केला पाहिजे. 'टायनी' रमाकांत देसाईसारखा हजारोंत एकादाच गोलंदाज निघतो कीं ज्याची शरीरयष्टि जलदगति गोलंदाजांना साजेशी नसतांना देखील तशी चेंडूफेक करण्यांत तो यशस्वी ठरतो.

कोणत्या प्रकारची गोलंदाजी करायची हें ठरल्यावर त्याप्रमाणें आपला 'रन् अप्' किंवा 'स्टार्ट' किती असावा, हें ठरवलें पाहिजे. स्टार्ट किती असावा याचे कांहींच नियम नाहींत. प्रत्येकानें स्वतःच्या सोयीनुसार हें जमवायचें असतें. मंदगति गोलंदाज साधारणपणें आपला स्टार्ट बरोबर जमवूं

शकतो. जलदगति गोलंदाजांबाबत मात्र विशेष विचार करायला पाहिजे. द्रुतगति गोलंदाजानें खूप लांबलचक स्टार्ट घेऊन जितक्या वेगानें धांवतां येईल तितक्या वेगानें धांवत येऊन चेंडू जोरांत फेंकावा असा एक सर्वसाधारण समज आहे. खरें म्हणजे असें कांहीं करण्याची गरज नसते. जलदगति गोलंदाजानें लक्षांत ठेवायची गोष्ट म्हणजे चेंडू टाकण्यापूर्वी तो जेव्हां उडी मारतो त्यावेळीं त्याचा वेग सर्वांत जास्त पाहिजे. त्या वेळीं कमालीचा वेग येईल अशा रीतीनें त्यानें आपला स्टार्ट जमवला पाहिजे. या बाबतींत ऑस्ट्रेलियाचा जगप्रसिद्ध तुफानी गोलंदाज रे लिंडवॉल हा आदर्श समजला जातो. इंग्रजींत ज्यास 'ड्रीम अॅक्शन्' (आदर्श पद्धत) म्हणतात तसा त्याचा

द्रुतगति गोलंदाजी–चेंडू टाकतांना

' रन् अप् ' व शेवटची उडी असते. मी लिंडवॉलची गोलंदाजी प्रथम पाहिली तेव्हा तो आदर्श तुफानी गोलंदाज पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें. आपल्याकडील गोलंदाजांत रमाकांत देसाईची पद्धत अनुकरणीय आहे. पण त्यालाहि त्यासाठीं कांहीं वर्षें तपश्चर्या करावी लागली. १९५९ च्या इंग्लंड-दौऱ्यावरून परत आल्यावरच त्याला आदर्श ' रन् अप् ' गवसला. शरीरयष्टि

द्रुतगति गोलंदाजी—चेंडू टाकल्यावर (फॉलो थ्रू)

किरकोळ असतांनाहि रमाकांत देसाई सतत तुफानी चेंडूफेक करूं शकतो. याचें मुख्य कारण त्याचा ' रन् अप् ' होय. जेव्हां जेव्हां तुम्ही त्याची गोलंदाजी पहाल तेव्हां तेव्हां तुम्हांस असें दिसेल कीं तो प्रथम हळूहळू धांवत येतो. विकेटपाशीं येतां येतां त्याचा वेग वाढत जातो. चेंडू टाकतांना शेवटची उडी घेतेवेळीं त्याचा वेग कमालीचा असतो. आणि म्हणनच टप पडल्यावर त्याचा चेंड बऱ्याच वेगानें जातो.

या उलट, कांहीं गोलंदाज खूप लांबून धांवत येतात पण 'बोलिंग क्रीज' पाशीं आल्यावर एकतर त्यांचा वेग कमी होतो अगर ते जवळ जवळ थांबतातच. आणि मग चेंडू टाकतात. अर्थात् या चेंडूस तितका वेग मिळूं शकत नाहीं. म्हणजे इतका लांबलचक स्टार्ट घेतल्याचे श्रम वायाच जातात म्हणायचे ! म्हणून द्रुतगति गोलंदाज होऊं इच्छिणाऱ्यांना माझ सांगणें आहे कीं आपणापेक्षां अनुभवी खेळाडू अथवा क्रिकेट–शिक्षक यांना विचारून आपला 'रन् अप्' बरोबर आहे किंवा नाहीं याची खात्री करून घ्यावी आणि नंतरच जलदगति किंवा मध्यमगति गोलंदाजीच्या भानगडींत पडा.

एकदा 'स्टार्ट' बरोबर जमला कीं पुढील पाऊल म्हणजे 'बोलिंग अॅक्शन्.' क्रिकेट हा खेळ 'साइड् वेज्' खेळण्यांत येतो असें तुम्ही कदाचित् वाचलें अगर ऐकलें असेल. फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण या तीनहि विभागांत खेळाडूस 'साइड्वेज्' राहावें लागतें. क्रिकेटचें हें पहिलें तत्त्व मानलें पाहिजें. या तत्त्वाची अंमलबजावणी गोलंदाजीच्या बाबतींत अतिशय कसोशीनें झाली पाहिजे. कोणताहि जगप्रसिद्ध गोलंदाज -- मग तो तुफानी मध्यमगति वा मंदगति असो-- 'साइड् वेज्' च गोलंदाजी करतो असें आपणास दिसून येईल. इंग्लंडचा फ्रेडी ट्रुमन घ्या, वेस्ट इंडीजचा वेस्ली हॉल किंवा ऑस्ट्रेलियाचें अॅलन् डेव्हिडसन् व रिची बेनॉ घ्या. एवढें कशाला ? आपले रमाकांत देसाई, विनू मांकड आणि सुभाष गुप्ते यांची गोलंदाजी पाहिली तरी ते सर्वजण 'साइड वेज्' गोलंदाजी करतात हें दिसून येईल. त्यांचें यश त्यांच्या अचूक 'रन् अप्' मध्यें आहे तसेंच तें त्यांच्या 'साइड् वेज्' गोलंदाजी–पद्धतींतहि आहे.

'बोलिंग अॅक्शन' ला एवढें महत्त्व कां याचा आतां आपण विचार करूं या. सर ॅन ब्रॅडमन आपल्या पुस्तकांत म्हणतात, "The purpose of bawling action is to enable delivery of the ball from a comfortable, well-balanced position, where-by the maximium efficiency is obtained form the co–ordination of

fingers, wrist, arms, shoulders and body." (हाताचीं बोटें, मनगट, बाहू, खांदे व शरीर या सर्वांच्या सुयोग्य संयोजनानें जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें आणि सुटसुटीतपणें चेंडू फेकणें हा गोलंदाजीच्या पद्धतीचा हेतु आहे.) सर डॉननें मोजक्या शब्दांत पण प्रभावीपणें गोलंदाजी–पद्धतीचा हेतु सांगितला आहे.

'साइड्वेज्' हें काय प्रकरण आहे तें आतां पाहू या. या पद्धतींत उजव्या हाताच्या गोलंदाजाचा डावा खांदा चेंडू टाकण्यापूर्वी विकेटच्या दिशेनें असतो. म्हणजे असें कीं त्या गोलंदाजाची छाती लेगकडील क्षेत्ररक्षकांच्या दिशेनें असते. छाती फलंदाजाकडे करून गोलंदाजानें चेंडू टाकला तर त्याचा वेग जरूर कमी होतो.

सर्व (उजव्या हाताचे) गोलंदाज चेंडू फेकतांना आपला उजवा पाय विकेटला समांतर ठेवतात. चेंडू टाकल्यावर त्याच कृतींत पुढें दोनचार पावलें जाणें आवश्यक असतें. यालाच 'फॉलो थ्रू' असें म्हणतात. मात्र असें पुढें जातांना एक खबरदारी घेतली पाहिजे ती म्हणजे सरळ पिचवर न जातां पिचच्या कडेला जावें. म्हणजे गोलंदाजाच्या बुटांच्या खिळ्यांनी पिच खराब होणार नाहीं. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं 'फॉलो थ्रू' मध्यें गोलंदाज सरळ पिचवर गेला तर तो अंपायर (पंच) व फलंदाज यांच्या बरोबर मध्यें येईल आणि त्यामुळें 'पायचीत' (एल्. बी. डब्ल्यू.) किंवा यष्टि॰ रक्षकाकडून झेलचीत ('कॉट बिहाइंड दि विकेट') याबाबतचा अचूक निर्णय देणें पंचास अशक्य होईल ! इतकेंच नव्हे, तर अशा बाबतींत पंचाचा निर्णय गोलंदाजास प्रतिकूल असाच असेल. कारण काय झालें तें त्याला नीट दिसलेंच नाहीं तर तो निर्णय देणार तरी काय कपाळ ?

क्रिकेटच्या प्रत्येक पुस्तकांत असें आवर्जून सांगितलेलें असतें कीं गोलं॰ दाजी करतांना त्याचा हात शक्य तेवढ्या उंचीवरून आला पाहिजे. त्यामुळें चेंडूस चांगली उशी ('लिफ्ट') मिळते. मुंबई संघाचा गुलाम गार्ड हा

गोलंदाज चांगला उंच व धिप्पाड आहे. पण गोलंदाजी करतांना तो बराच वांकतो आणि हात उंचावरून न आणतां बराचसा 'राउंड आर्म' पद्धतीनें चेंडू टाकतो. त्याच्या लहानपणीं त्याला 'ओव्हर आर्म' गोलंदाजी करण्यास कोणी शिकविलें असतें तर गुलाम गार्ड आजच्यापेक्षां किती तरी पटींनी यशस्वी झाला असता.

'रन् अप्' चें महत्त्व वर सांगितलें आहेच. 'रन् अप्' सरळ असावा कीं जरा तिरका असावा असा एक प्रश्न उपस्थित होतो. हा प्रश्नहि ज्याचा त्यानें आपापल्या सोयीप्रमाणें सोडवावा. साधारणपणें जलदगति गोलंदाज सरळ धांवत येतात तर मध्यमगति व मंदगति गोलंदाज किंचित वाकडा 'स्टार्ट' घेतात. बरेच डावरे गोलंदाज अंपायरच्या पाठीमागून धांवत येतात.

ऑस्ट्रेलियाचा डावरा लेग् ब्रेक् व गुगली गोलंदाज जॉर्ज ट्राइब् १९४९ सालीं भारतांत प्रथम आला, त्यावेळीं मंदगति गोलंदाज आपला पाय 'ड्रॅग्' करतांना (ओढतांना) मी पाहिल्यांदाच पाहिलें. मी त्याला त्याबाबत विचारलें तेव्हां तो म्हणाला कीं जगांतील कोणताही अव्वल प्रतीचा गोलंदाज असो, तो 'ड्रॅग्' करतोच. गोलंदाजानें 'ड्रॅग्' केल्यामुळें वेगवान अगर फिरकी गोलंदाजी टाकण्यास त्याला मदत होते. वेगवान व फिरकी गोलंदाज 'ड्रॅग्' करतात याचीं आपणांकडील दोन ठळक उदाहरणें म्हणजे 'वेग व्यापारी' दत्तु फडकर व 'फर्गी' सुभाष गुप्ते. सुभाष गुप्ते हा उत्कृष्ट 'स्पिनर' गणला जात असे पण फडकर देखील कांहीं कमी नव्हता. मी पाहिलेल्या जगांतील चांगल्या चांगल्या गोलंदाजांत दत्तु फडकरचा क्रमांक मी बराच वर लावीन.

चेंडूचा पल्ला व दिशा ('लेंग्थ' व 'डिरेक्शन')

तुमचा 'रन् अप्' ठरला, 'बोलिंग ॲक्शन्' जमली. आतां गोलंदाजीच्या सर्वांत महत्वाच्या मुद्याकडे आपण वळूं या. तो म्हणजे 'लेंग्थ' व 'डिरेक्शन'. अमक्या गोलंदाजानें 'गुड लेंग्थ बॉल्' टाकला असें आपण

नेहमीं वाचतों अगर ऐकतों. यालाच आपण पल्लेदार चेंडू म्हणूं या. ज्या चेंडूवर पुढें खेळावें कीं मागें खेळावें असा फलंदाजाच्या मनांत गोंधळ निर्माण होतो आणि ज्या चेंडूवर त्याला कसलाहि फटका मारतां येत नाहीं आणि म्हणूनच नुसता बचावात्मक रीतीनें अडवावा लागतो त्यास पल्लेदार चेंडू असें म्हणतां येईल. चेंडूचा पल्ला प्रत्येक फलंदाजावरहि अवलंबून असतो. फलंदाजास पल्लेदार वाटणारा चेंडू दुसऱ्या फलंदाजास 'ओव्हर पिच्ड' (फाजील पल्लेदार) वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. म्हणून प्रत्येक फलंदाजाची शैली पाहून त्याप्रमाणें गोलंदाजानें आपला पल्ला कमीजास्त केला पाहिजे. तुफानी गोलंदाजीचा पल्ला व मंदगति गोलंदाजीचा पल्ला वेगवेगळा असणार हें अगदीं उघड आहे. जलदगति गोलंदाजास मंदगति गोलंदाजापेक्षां चेंडू जरा तोकडाच किंवा कमी पल्ल्याचा टाकायला पाहिजे. कारण त्याच्या चेंडूची गति जास्त असते. 'नेट' मध्यें सतत गोलंदाजीचा सराव केला तर चेंडूच्या पल्ल्यावर आपण आवश्यक तसें नियंत्रण ठेवूं शकतों. नेटमध्यें फलंदाज खेळत असतांना आपणांस आपल्या गोलंदाजीचें नीट मूल्यमापन करतां येत नाहीं. म्हणून खास वेगळ्या नेटमध्यें यष्टि रक्षकासह गोलंदाजीचा सराव करणें आवश्यक आहे. क्रिकेट शिक्षकानें पिचवर खूण केली असेल तेथें जास्तींत जास्त चेंडू टाकणें यावरच आपलें पुढील यश अवलंबून राहील. असा सराव करणें हें कंटाळवाणें व त्रासदायक काम आहे हें मला मान्य आहे. फलंदाजास फसवण्यांत, चकवण्यांत जी मजा व 'ग्लॅमर' आहे ती यांत नाहीं हें एकदम कबूल ! पण याच प्रकारच्या सरावामुळें आपण चेंडू किती 'स्पिन्' किंवा 'स्विंग' करूं शकतों याचा गोलंदाजास अदमास येतो. त्यामुळें क्रिकेट सामन्यांत गोलंदाजी करणें त्यास सोपें जातें. अशा सरावामुळें मिळालेल्या यशाचें एक उज्ज्वल उदाहरण म्हणजे अखिल भारतीय कीर्तीचे तुफानी गोलंदाज फडकर यांचें होय.

फडकर प्रथम एल्फिन्स्टन् कॉलेजांत आले तेव्हां आमच्या त्या कॉलेजचे क्रिकेट-शिक्षक श्री. होमी वजिफदार हे होते. त्यांनीं फडकरना रोज एक

तास नेटमध्यें सराव करायला सांगितलें. फडकरांची महत्वाकांक्षा व चिकाटी एवढी जबरदस्त कीं त्यांनी असा सराव सतत दोन महिने केला. याचा फायदा असा झाला कीं षट्कांतील सहा चेंडूपैकीं किमान चार चेंडू पल्लेदार टाकून फडकर दांडचा उडवू लागले. ते 'इन्‌स्विगर' व 'औट स्विगर' टाकीत. गोलंदाजीवर अशी तपश्चर्यापूर्वक हुकुमत बसल्यामुळें फडकर अगदीं तरुण वयांतच भारतातर्फे कसोटी सामन्यांत खेळले आणि त्यांनी ती बहुमानाची जागा बरीच वर्षें सतत टिकवून ठेवली होती. असें असतें प्रदीर्घ तपश्चर्येचें फळ.

गोलंदाजीची 'दिशा' (डिरेक्शन) म्हणजे जास्तींत जास्त चेंडू स्टंप्सवर अचूक टाकणें असा एक समज आहे. मूलतः हें खरें आहे, पण तें पूर्ण सत्य नव्हे. कारण सामन्यांतील 'युद्धनीती' वरहि गोलंदाजी कशी टाकायची हें अवलंबून असतें. उदाहरणार्थ. 'ऑफ' कडे बरेच क्षेत्ररक्षक ठेवून एकादा गोलंदाज चेंडूफेक करीत असला तर 'ऑफ् स्टंप्' च्या बाहेरच त्यांचे चेंडू पडले पाहिजेत. त्यानें एकामागून एक चेंडू तीनहि स्टंपावरच टाकले तर चांगला फलंदाज 'ऑन्' कडील रिकाम्या जागीं ते चेंडू फटकावून त्या गोलंदाजीचा धुव्वा उडवील. पल्ला व दिशा हीं गोलंदाजीचीं महत्वाचीं अंगें आहेतच, पण शिवाय तीं एकमेकांवर अवलंबून आहेत. समजा, एकाद्या गोलंदाजाला 'दिशा' आहे पण 'पल्ला' नाहीं, अशी गोलंदाजी भरपूर झोडपल्याशिवाय फलंदाज सोडणार नाहीं. पल्ला व दिशा दोनहि असतील तर फलंदाजास बचावाचें धोरण स्वीकारणें भाग पडेल. असा गोलंदाजच फलंदाजावर प्रभाव गाजवूं शकतो.

जलदगति किंवा तुफानी गोलंदाजी

सरावांत वरील गोष्टी कशा साध्य कराव्यात तें आपण पाहिलें. आतां सामन्यांत विविध प्रकारच्या गोलंदाजांनी कशी चेंडूफेक करावी तें आपण बघूं या. द्रुतगति गोलंदाज हा प्रत्येक संघाचा एक आधारस्तंभच असतो. नव्या चेंडूनें मारा सुरू करण्याचें काम त्याच्याकडेच असतें. नवीन चेंडूवर

चकाकी अथवा गुळगुळीतपणा असतो. चेंडू स्विंग होण्यांस त्याची मदत होते. जलदगति गोलंदाजानें चेंडू शक्य तों ' ओव्हर पिच्ड ' टाकला पाहिजे. यामुळें दोन गोष्टी साधतील. एक तर फलंदाजास पुढें खेळावें लागेल. चेंडू किती स्विंग् होईल याचा अदमास घेऊन चेंडू अडवण्याचा त्याला प्रयत्न करावा लागेल. त्याच्या अंदाजापेक्षां चेंडू कमी वा जास्त स्विंग् झाल्यास त्याचा स्लिपमध्यें झेल जाईल अगर त्याचा त्रिफळा उडेल. सामन्यांत खेळायला आलेल्या फलंदाजास सुरुवातीसच असे चेंडू टाकले तर ते त्याला आवडत नाहींत आणि तो गडबडतो. या उलट, आंखूड पल्ल्याचे चेंडू आले तर ते त्याला हवेच असतात. कारण ते चेंडू पिचवर पडल्यावर त्यांना मिळणारी गति व स्विंग यांचा तो अंदाज घेऊं शकतो.

' बाउन्सर ' व ' यॉर्कर ' हीं तुफानी गोलंदाजाचीं प्रमुख हत्यारें होत. जगांतील कोणत्याहि फलंदाजास जलदगति गोलंदाजी आवडत नाहीं असे उद्‌गार इंग्लंडचे डावरे फलंदाज मॉरिस लीलँड यांनी एकदां काढले होते. ते अगदीं खरे आहेत. (No batsman is happy to play fast bawling.) द्रुतगति गोलंदाज बदलण्यांत येऊन मंदगति गोलंदाज आला कीं फलंदाज सुटकेचा सुस्कारा सोडतो. द्रुतगति गोलंदाजाबद्दल वाटणाऱ्या या भीतीचें कारण म्हणजे ' बाउन्सर ' किंवा ' आपटबार ' ! आंखूड टप्प्याचा किंवा पल्ल्याचा जो चेंडू फलंदाजाच्या खांद्यापासून डोक्यापर्यंतच्या भागावर उशी घेतो तो खरा परिणामकारक ' बाउन्सर. ' या चेंडूचा टप्पा फारच कमी वा आंखूड असेल तर तो कुचकामी ठरतो. कारण तो उशी घेतांना फलंदाजास सहज दिसतो आणि तो जरा वांकून अगर जरा बाजूस होऊन तो चेंडू टाळूं शकतो. ज्या चेंडूवर फलंदाजास घाईघाईनें बचावाचा फटका मारणें भाग पडेल तोच खरा प्रभावी बाउन्सर ! या विषयीं मला असा इशारा देणें आवश्यक वाटतें कीं या चेंडूचा वापर हात राखूनच करावा. परत परत ' आपटबार ' चेंडू टाकून त्या अस्त्राची धार बोथट करू नये. शिवाय त्यांत गोलंदाजाची शक्तीहि वाया जाते. कारण एक बाउन्सर टाका-

यचा झाल्यास नेहमींच्या तीन चेंडू एवढी ताकद त्यांत खर्चावी लागते. द्रुतगति गोलंदाजास तर आपली शक्ति जेवढी टिकवतां येईल तेवढी टिकविणें अत्यावश्यक असतें. कारण इतर गोलंदाजांच्या मानानें जलदगति गोलंदाजाची कारकीर्द (करिअर) लौकर संपते. प्रत्येक सामन्यांत इतरांपेक्षां त्याच्यावरच संघाची जास्त मदार असते. साहजिकच त्यास सर्वांपेक्षा अधिक श्रम करावे लागतात. त्यामुळें नियमितपणें व्यायाम करून शरीर बळकट बनवून ' स्टॅमिना ' वाढवणें त्याला आवश्यक ठरतें.

बाउन्सरनंतर आणखी एक शस्त्र म्हणजे ' यॉर्कर ' साध्या सरळ भाषेंत सांगायचें म्हणजे बॅटीच्या खालीं पडलेला चेंडू म्हणजे यॉर्कर. पुष्कळ गोलंदाज यॉर्कर टाकायचा प्रयत्न करीत असले तरी फलंदाज हाच त्या चेंडूस यॉर्कर बनवतो ? फलंदाज त्याच चेंडूस जरा पुढ जाऊन खेळला तर तो ' फुल टॉस ' होतो आणि जरा मागें खेळला तर ती ' हाफ व्हॉली ' ठरते. म्हणूनच हा चेंडू टाकायला बराच सराव व प्रयास पडतात. नाहींतर चांगला फलंदाज त्याचा फुल टॉस करून चौकार लगावील. उत्कृष्ट यॉर्कर हा नेहमी मधल्या दांडीवर नेम धरून टाकण्यांत येतो. यॉर्कर टाकण्यांत रे लिंडवॉल अतिशय पटाईत होता.

जलदगति व मध्यमगति गोलंदाज यांच्यांत फक्त वेगाचा फरक आहे. बाकीच्या सर्व गोष्टी या दोनहि प्रकारच्या गोलंदाजांना सारख्याच लागू आहेत. जलदगति गोलंदाजानें शक्य तों अचूकपणें यष्टीवर चेंडूफेक करायची असते. मध्यमगति गोलंदाजावर तर ही जबाबदारी जास्त असते. अचूकपणा (अॅक्युरसी) हा मध्यमगति गोलंदाजीचा आत्मा आहे. त्याचा वेग कमी असल्यानें, त्यांत अचूकपणा नसेल तर त्याची गोलंदाजी फलंदाज सहज झोडपून काढू शकेल. सर्व प्रकारच्या गोलंदाजींत अचूकपणा आवश्यक आहे, पण मध्यमगति गोलंदाजींत तो अगदीं असलाच पाहिजे.

' स्विंग् ' गोलंदाजी

जलदगति व मध्यमगति गोलंदाजांना साधारणपणें नव्या चेंडूनें

गोलंदाजी करावी लागते. नव्या चेंडूवरील चकाकीमुळें (शाइन्), चकाकी असेपर्यंत तो चेंडू ' स्विग् ' होतो. हे स्विग् दोन प्रकारचे असतात. एक ' औट स्विगर. ' हा चेंडू जमिनीवर पडून स्लिपच्या दिशेनें जातो आणि दुसरा इन्स्विगर–हा चेंडू जमिनीवर पडून लेग्स्लिप्च्या दिशेनें जातो.

औट स्विंगर

औटस्विंगर टाकतांना चेंडूची शिवण दोन बोटांमध्यें धरावी आणि आंगठा त्याच्या बरोबर खालीं शिवणीवर ठेवावा. शिवणीची दिशा स्लिप्स्कड असावी. औटस्विंगर टाकतांना उजवा हात थोडासा बाजूनें म्हणजे ' राउंडिश् ' करून टाकावा. चेंडू हातांतून सुटत असतांना मनगट थोडें फिरवावें म्हणजे ज्या दिशेनें स्विग् करावयाचा त्या दिशेनें म्हणजेच स्लिप्स्च्या दिशेनें हाताचा तळवा जाईल.

इन् स्विंगर

इन्स्विंगर टाकतांना हाताचीं दोन्हीं बोटें जवळ जवळ धरून शिवणीच्या डाव्या बाजूस ठेवावींत. आंगठा शिवणीच्या बरोबर खालीं असावा. शिवणीची दिशा 'फाइन् लेग्'च्या बाजूस असावी. हा चेंडू टाकतांना हात शक्य तेवढा उंचावर न्यावा. हात जितका आपल्या कानाजवळून जाईल तेवढ्या प्रमाणांत स्विंग् जास्त होण्याचा संभव असतो. चेंडू सुटतांना मनगट अशा रीतीनें फिरवावें कीं हाताचा तळवा 'लेग्साइड'च्या दिशेनें जाईल.

हे दोन्ही प्रकारचे चेंडू टाकतांना लक्षांत ठेवायची महत्त्वाची गोष्ट म्हणजे चेंडू किती स्विंग् होणार हें जाणून तो स्विंग् झाल्यावर विकेटवरच जाईल अशा रीतीनें चेंडू टाकावयाचा. अर्थात्, सतत सरावाशिवाय हें जमणार नाहीं. फलंदाजाला नवा चेंडू खेळायला लावला पाहिजे. चेंडू विकेटच्या बाहेर जात राहिला तर चांगला फलंदाज तो सरळ सोडून देईल आणि नवा चेंडू

अशा रीतीनें वाया जाईल. म्हणजें गोलंदाजास त्याचा फायदा मिळू शकणार नाहीं.

हवेंतून येतांना व जमिनीवर पडल्यावर जो चेंडू स्विंग् होतो तो अर्थातच खेळायला सोपा असतो. पण जो चेंडू हवेंतून सरळ येतो आणि जमिनीवर पडतांपडतां स्विंग् होतो तो चेंडू खेळायला सर्वांत कठीण असतो. या चेंडूलाच ' लेटस्विंगर ' म्हणतात. जो चेंडू हवेंतून येतांना एका दिशेनें येतो आणि जमिनीवर पडल्यावर त्याच्या बरोबर विरुद्ध दिशेनें स्विंग् होतो तो खेळायला फार अवघड असतो. ' अशा प्रकारचा चेंडू मी टाकतोंच' असें म्हणून कोणताहि गोलंदाज असा चेंडू टाकूं शकत नाहीं. शंभरांतील एकादाच चेंडू अशा रीतीनें वळतो. साधारणतः चेंडू हवेंतून ज्या दिशेनें येतो त्याच दिशेनें जमिनीवर पडल्यावरहि तो वळतो.

लक्षांत ठेवायची आणखी एक गोष्ट म्हणजे नव्या चेंडूनें गोलंदाजी करतांना चेंडू बोटांनी नुसता सोडावा, त्यास ' स्पिन्' करूं नये.

चेंडूचा वेग जेवढा जास्त तेवढाहि स्विंग् कमी होतो. पण जलदगति गोलंदाजींना तेवढाहि स्विंग् पुरेसा होतो. कारण चेंडूच्या जोरदार वेगामुळें फलंदाज चूक करण्याचा संभव असतो. म्हणजेच बॅटीचा ओझरता स्पर्श (स्निक्) होऊन झेल उडण्याची शक्यता असते. चेंडू जास्त स्विंग् झाला तर फलंदाज पुरेपूर फसतो. पण त्याच्या बॅटीला चेंडूचा स्पर्शहि होत नाहीं.

' ऑफ स्पिन् ' गोलंदाजी

फिरक्या (स्पिन्) गोलंदाजीचे दोन प्रकार असतात. एक ऑफ ब्रेक व दुसरा लेग् ब्रेक. ऑफ ब्रेकचा प्रकार त्यांतल्या त्यांत सोपा असल्यानें बरींच लहान मुलें अशी गोलंदाजी लवकर शिकतात. ऑफ स्पिन् चेंडू सहज टाकतां येतो. हाताचा नैसर्गिक ' स्विंग् ' व शरिराचा पवित्रा यांचा पुरेपूर उपयोग या गोलंदाजींत होतो. या प्रकारच्या गोलंदाजाचा मुख्य फायदा हा कीं दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या गोलंदाजापेक्षां त्याला जास्त अचूकपणें गोलंदाजी करतां येते.

ऑफ ब्रेक टाकतांना मुख्यतः तर्जनीचा (पहिलें बोट किंवा इंग्रजींत

ज्यास 'इंडेक्स् फिंगर' म्हणतात तें.) उपयोग करावा लागतो. चेंडूस फिरकी देतांना, ती डावीकडून उजवीकडे जाईल अशी द्यावी. अशा वेळीं आपल्या हाताची कृति, आपण घरचा दरवाजा 'नॉब' फिरवितांना होतो तशीच होते. पहिल्या व मधल्या बोटांत धरून चेंडू टाकला तरी फिरकी देण्याचें मुख्य काम पहिलें बोटच करतें. तिसरें व चौथें बोट (करंगळी) यांचा उपयोग चेंडू हातांत बरोबर बसावा एवढ्यासाठींच होतो.

ऑफ स्पिन गोलंदाजीच्या वेळीं
चेंडू कसा धरावा ?

भारतांतील 'पर्फेक्ट' पिचवर ऑफ ब्रेक गोलंदाज फारच क्वचित् यशस्वी ठरतो. कारण चेंडू पडल्यानंतर तो ऑफ कडून लेगकडे न वळतां सरळ जातो. खराब विकेटवर किंवा काथ्याच्या मॅटिंग विकेटवर अशी गोलंदाजी खेळणें फार अवघड जातें. त्यामुळें अशा विकेटवर 'ऑफ स्पिनर' यशस्वी ठरतो. याची आपणांकडील उत्कृष्ट उदाहरणें म्हणजे गुलाम अहंमद व जसू पटेल. १९५२ सालीं इंग्लंडच्या दौऱ्यावर असतांना, पावसामुळें बिघडलेल्या अगर 'क्रंब्लिग्' विकेटस् गुलाम अहंमदला पुष्कळ मिळाल्या. आणि त्यानें त्यांचा पुरेपुर उपयोग करून घेतला. त्यावेळीं गुलाम अहंमह जगांतील सर्वोत्कृष्ट तीन ऑफ् ब्रेक गोलंदाजांत गणला जात असे. दुसरे दोघे म्हणजे दक्षिण आफ्रिकेचा ॲथोल रोवन व ग्लंडचा जिम् लेकर.

ऑफ ब्रेक् गोलंदाजानें केवळ ऑफ ब्रेकच टाकले पाहिजेत असें नाहीं. थोडी विविधता आणण्यासाठीं त्यानें चेंडूच्या वेगांत कमी जास्त बदल करावा. (चेंज् ऑफ पेस्) अगर न वळणारा चेंडू टाकण्यास शिकावें. गुलाम अहमद 'चेंज् फॉफ पेस्' चांगल्या प्रकारें करीत असे. त्याचा नेहमीचा चेंडू मंदगति व 'फ्लाइटेड' असे. पण त्याचा सरळ चेंडू चांगलाच वेगवान् असे. गुलामचें वैशिष्टच असें कीं त्याचा तो चेंडू साधारणपणें सरळ किंवा किंचित् 'लेग् कटर' प्रमाणें जात असला तरी कधीं कधीं तो 'इनकटर' सारखा आंत येऊन फलंदाजाची तिरपीट उडवीत असे !

वर सांगितलेला दुसऱ्या प्रकारचा चेंडू टाकण्याची जिम् लेकरची हातोटी वाखाणण्यासारखी होती. त्याच कृतीनें हाताच्या बोटांची फिरवा-फिरव तशीच ठेवून (अर्थात् फलंदाजाच्या दृष्टीनें) लेकर तो चेंडू ऑफ दांडीवर किंवा जरा बाहेर टाकी. ऑफ ब्रेक् समजून फलंदाज खेळायला गेला कीं त्याचा त्रिफळा उडे अगर स्लिपमध्यें झेल जाई. कारण या चेंडूस त्यानें फिरकी दिलेली नसेच. ऑस्ट्रेलियाचा भूतपूर्व कर्णधार इयत जॉन्सन् याचाहि असा चेंडू टाकण्यांत हातखंडा होता. जगद्विख्यात् डॉन् ब्रॅडमन्ला एकदां नव्हे तर दोनदां अशा चेंडूनें बनवून इयन्नें त्यास 'यष्टिचीत' (स्टंप्ड) केलें होते ! " By holding the palm of the hand under the ball and pointing skywords as the ball is spun and as it leaves the hand. " अशा रीतीनें इयन् तो चेंडू टाकीत असे. हा चेंडू जमिनीवर पडल्यानंतर ऑफ ब्रेकप्रमाणें न वळतां सरळ जातो व फलंदाजास चकवितो !

आपल्याकडील ऑफ ब्रेक गोलंदाज बहुधा 'ओव्हर दि विकेट'



गोलंदाजी करतात. अगदीं भक्कम (परफेक्ट) विकेटवर अशा गोलंदाजीनें धांवा अटकावल्या जातात, पण विकेट खराब असते तेव्हां ऑफ ब्रेक गोलंदाजानें 'राउंड दि विकेट' गोलंदाजी केल्यानें फायदा होतो. तशा पद्धतीनें, फलंदाजांना पायचीत करण्याची संधी गोलंदाजास अनेकदां मिळते. 'ओव्हर दि विकेट' गोलंदाजी करतांना जो चेंडू लेगच्या दांडीच्या अगदीं जवळून जाईल 'तोच चेंडू, 'राउंड दि विकेट' पद्धतीनें टाकला तर यष्टीवर आदळण्याची शक्यता असते. फलंदाजासदेखील 'राउंड दि विकेट' गोलंदाजी खेळणें कठीण जातें.

ओव्हर दि विकेट किंवा राउंड दि विकेट चेंडूफेक करतांना ऑफ ब्रेक गोलंदाजानें हें लक्षांत ठेवावें कीं फलंदाजास बचावात्मक खेळण्यासाठीं पुढें खेंचलें पाहिजे. चेंडू ऑफ दांडीवर किंवा जरा बाहेर टाकावा. तो चेंडू वळणार कीं नाहीं अशा बुचकळ्यांत फलंदाज पडतो. त्यामुळें तो पायचीत वा त्रिफळाचीत होण्याचा संभव असतो. किंवा लेग स्लिपवर, यष्टिरक्षकाच्या हातीं अगर फर्स्ट स्लिपवर त्याचा झेल उडण्याची शक्यता असते.

विनू मांकडसारखे डावरे गोलंदाज म्हणजे खरोखरीं डाव्या हातानें गोलंदाजी करणारे ऑफ ब्रेक गोलंदाजच होत. त्यांचे चेंडू लेगकडून ऑफकडे जात असल्यामुळें डावऱ्या फलंदाजांना ते ऑफ ब्रेकच होतात.

लेग्–ब्रेक चेंडू धरण्याची पद्धत

लेग् ब्रेक चेंडू हातांतून सोडतांना

मराठी ... दा. क्र. ११८६६ ... शाखा (स्थळ प्रत)

लेग् ब्रेक् गोलंदाजी व गुगली गोलंदाजी

हाताचें मनगट उलटें करून लेग् ब्रेक् टाकायचा असल्यामुळें अशा प्रकारची गोलंदाजी बहुधा 'अचूक' असत नाहीं. अशा चेंडूवर नियंत्रण आणायला पुष्कळ सराव करावा लागतो. ऑफ ब्रेक् टाकतांना पहिलें बोट चेंडूस फिरकी देतें तर लेग् ब्रेक् टाकतांना तें काम तिसरें बोट करतें. आंगठा व पहिलीं दोन बोटें चेंडूचा आवश्यक तो तोल राखतात. चेंडू हातांतून सुटण्यापूर्वी, हाताचा तळवा जवळ जवळ फलंदाजाकडे 'पहात' असतो, नंतर तिसरें बोट चेंडूस फिरकी देतें आणि चेंडू गलीच्या किंवा पॉइंटच्या दिशेनें जातो.

गुगली म्हणजे लेग् ब्रेक्च्या कृतीनें टाकलेला ऑफ ब्रेक्. लेग्ब्रेक टाकतांना चेंडू धरतात तसाच गुगली टाकतांनाहि धरायचा असतो. पण चेंडू टाकतांना मनगट जरा जास्त वांकवून तो टाकायचा असतो. मनगट इतकें वळतें कीं त्याची पाठची बाजू फलंदाजास सहज दिसते. मनगट इतकें वाकवल्यामुळेंच चेंडू तिसऱ्या बोटाच्या वरून येतो आणि करंगळीच्या टोकावरून स्पिन् केला जातो. म्हणूनच चेंडू पडल्यावर तो ऑफ ब्रेक्प्रमाणें वळतो. या चेंडूचें आणखी एक वैशिष्टय म्हणजे सर्वसाधारण लेग्ब्रेक्पेक्षां तो थोडा कमी मंदगाती असतो. याचाच अर्थ असा कीं चेंडू केवळ उलट बाजूस वळतो एवढेंच नव्हे तर 'तो चेंज् ऑफ पेस्' प्रमाणें कमी वेगाचा असतो.

हा चेंडू प्रभावी ठरण्याचें कारण म्हणजें तो टाकतांनाची 'फसवी कृति' (डिसेप्टिव्ह अॅक्शन) होय. म्हणून गोलंदाजानें या अस्त्राचा एकसारखा उपयोग करूं नये. फलंदाजानें एकदां का गुगलीची खुबी ओळखली कीं तिचा प्रभाव गेलाच समजा. मग, ठोकाठोकी करण्यासाठीं दुसरा चांगला चेंडू नाहीं !

गुगली चेंडू पंजाचे पाठीमागून सोडतांना

स्लो लेग् ब्रेक् व गुगली गोलंदाज यांनी आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवावी. चेंडू 'फ्लाइट' करून फलंदाजाच्या शक्यतों जवळ टाकावा. फलंदाजास पुढें खेळायला लावण्यांतच या गोलंदाजास यश मिळण्याचा संभव असतो. चेंडू जितका जलद तितकी त्यास फिरकी मिळण्याची शक्यता कमी. उलट तो 'स्किड्' होईल. आंखूड टप्प्याचा चेंडू टाकण्यांत तोटा असा कीं तो मारायला सोपा असतो. दुसरा तोटा असा कीं चेंडू कोणत्या बाजूनें वळणार व किती वळणार हें फलंदाजास सहज समजतें. पुढें जाऊन खेळताना फलंदाजास तेवढीशी खात्री नसते. त्याच्या अपेक्षेपेक्षां चेंडू जास्त वळतो तेव्हां त्याचा स्लिपमध्यें झेल उडण्याचा संभव असतो.

वर म्हटलें आहे कीं गुगली चेंडू लेग् ब्रेक्पेक्षा मंदगति असतो. पण सेसिल पेपर व रिची बेनॉ हे दोन ऑस्ट्रेलियन गोलंदाज ज्या पद्धतीनें हा चेंडू टाकतात त्यामुळें तो जमिनीवर पडल्यावर वेगानें येतो. त्यांनीं या

चेंडूस ‘फ्लिपर’ हें नांव ठेवलें आहे. ते हा चेंडू मुद्दाम ‘आंखुड’ टाकतात. त्यामुळें फलंदाजाचें लक्ष विचलित होऊन चेंडू तडकावण्यासाठीं बॅट उगारून तो तयार राहातो. पण प्रत्यक्षांत होतें काय कीं तो चेंडू त्याच्या अपेक्षेहून वेगानें आल्यामुळें बॅट वरच राहाते आणि तो पायचीत किंवा त्रिफाळाचीत होतो. पेपरनें भारताचे अग्रगण्य फलंदाज विजय हजारे, रुसी मोदी, किशनचंद आदींना अशा चेंडूनेंच बनवलें होतें!

आपला सुभाष गुप्तेहि असला ‘स्ट्रेट थ्रू’ चेंडू टाकण्यांत निपुण होता. लेग् ब्रेक्च्या कृतीनेंच तो हा चेंडू टाकी. पण चेंडू टाकतांना तो त्यास फिरकी न देतां सरळ सोडून देई. फलंदाजानें हें लक्षपूर्वक पाहिलें नाहीं तर तो त्या चेंडूवर लेग् ब्रेक् म्हणून खेळायला जाऊन पायचीत अगर त्रिफळाचीत होई. शेवटशेवटच्या फलंदाजांना खडाखड् बाद करण्यास सुभाषला अशा चेंडूचा फार उपयोग होई. पण मी मी म्हणणाऱ्या कांहीं प्रख्यात फलंदाजांनांहि त्यानें अशा चेंडूनें पुरेपूर चकविल्याचें मी पाहिलें आहे.

हाताच्या उलट बाजूनें चेंडूस फिरकी द्यावी लागत असल्यामुळें अशा गोलंदाजास पल्ला किंवा टप्पा (लेंग्थ) यांवर हुकुमत मिळविणें सहजसाध्य नसतें. अशी गोलंदाजी अनेकदां ‘महाग’ पडते. म्हणून अशा प्रकारच्या गोलंदाजास ‘नेट’मध्यें पुष्कळ मेहेनत करावी लागते.

६

क्षेत्ररक्षण : एक अत्यंत महत्वाचें अंग

क्रिकेटमध्यें फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण हीं तीन महत्वाचीं अंगें आहेत. मी तर म्हणेन कीं क्षेत्ररक्षण हें सर्वांत महत्वाचें अंग आहे. एकादा फलंदाज वा गोलंदाज आपली चमक प्रगट करूं शकला नाहीं तरी अप्रतिम क्षेत्ररक्षण करून त्यानें ५०–६० धांवा वांचविल्या किंवा एकादा झेल पकडून प्रतिपक्षाचा फलंदाज बाद केला तर त्यानें भरीव कामगिरी केली असें म्हणतां येईल. या उलट, त्या फलंदाजानें स्वतः ७०–८० धांवा करून क्षेत्ररक्षण करतांना एकाद्यास जीवदान दिलें आणि त्यानें १०० धांवा केल्या तर तो खेळाडू आपल्या संघास २०–३० धांवांनी भारी पडला असें समजलें पाहिजे.

यासंबंधांत मला एक उद्‌बोधक घटना आठवते. मुंबई संघ वि. होळकर संघ यांचा रणजी करंडक अखेरचा सामना इंदूरला चालू होता. पूर्वी केंब्रिज विद्यापीठातर्फे खेळलेला पॅट् डिकिन्सन् मुंबई संघांत होता. मी मुंबईतर्फे

यष्टिरक्षण करतांना चार झेल पकडले होते. पण पांचवा झेल माझ्या हातून सुटला होता. ही चूक आमच्या संघास फार महाग पडली. माझ्या हातून ज्या फलंदाजास १० धावांच्या आंत जीवदान मिळालें तो ९९ धांवा करून गेला ! संध्याकाळीं मुक्कामावर परततांना ज्याच्या गोलंदाजीवर मी तो झेल सोडला होता तो मला म्हणाला, " मंत्री, तुला गोळी घालून ठार मारावं असं मला वाटतं ! " तो महाग झेल सोडल्याबद्दल माझें मन मला खात होतेंच, पण त्याच्या रागाचा तो स्फोट ऐकून मी जास्तच खिन्न झालों ! डिकिन्सन्नें माझी मनःस्थिति जाणली.

याचवेळीं डिकिन्सन्नें मला इंग्लंडमधील एक गोष्ट सांगितली. तो म्हणाला, " आज तूं चार झेल पकडलेस ना ? मग कशाला उगाच खंत करीत बसतोस ? इंग्लंडमध्यें एकादा खेळाडू सामना खेळून परत आला कीं त्याचा मित्र त्याला विचारतो, " काय, किती धांवा केल्यास आज ? " खेळाडू उत्तरतो, " शून्य. "

" बरं, मग विकेट्स् किती घेतल्यास ? "

" एकहि नाहीं ! "

" अरे, मग झेल बिल पकडलेस कीं नाहीं ? "

" हो तर, दोन पकडले ! "

" अरे, मग असा सुतकी चेहरा कशासाठीं ? त्यांच्या दोन खेळाडूंना तर तूं बाद केलंस ! "

इंग्रज लोक क्षेत्ररक्षणास किती महत्व देतात तें यावरून सहज दिसेल.

क्रिकेटच्या जगांत दक्षिण आफ्रिकेचें स्थान बरेंच वरचें आहे. त्यांची फलंदाजी उत्कृष्ट आहे हें त्याचें कारण नव्हे. त्यांच्या गोलंदाजींत भीति-दायक असें कांहींच नाहीं. पण त्या गोलंदाजांना क्षेत्ररक्षकांकडून जो प्रतिसाद अगर पाठिंबा मिळतो त्यामुळें ते अव्वल दर्जाचे गोलंदाज वाटतात दक्षिण आफ्रिकेचा संघ दौऱ्यावर असतो तेव्हां पहिल्या ते शेवटच्या सामन्यापर्यंत त्यांचा एक कार्यक्रम अगदीं निश्चित असतो. तो म्हणजे दररोज सामना सुरू

होण्यापूर्वी अर्धा तास आधीं सर्व खेळाडूंनी मैदानावर येऊन क्षेत्ररक्षणाचा सराव करणें. अशा तपश्चर्येमुळेंच आज ते जगांतील अजोड क्षेत्ररक्षक ठरले आहेत.

कोणीहि खेळाडू उत्तम फलंदाज व गोलंदाज होऊं शकला नाहीं तरी सतत पुष्कळ मेहनत करून त्यास चांगला क्षेत्ररक्षक बनतां येईल. अत्युत्कृष्ट क्षेत्ररक्षक हा जन्मावाच लागतो हें खरें, पण चांगला क्षेत्ररक्षक कोणीहि होऊं शकतो; मात्र कष्ट करण्याची त्याची तयारी पाहिजे.

आतां आपण क्षेत्ररक्षकांच्या जागांचा विचार करूं. प्रथम 'फर्स्ट स्लिप' या क्षेत्ररक्षकानें वांकून, थोडे पाय फांकून पण दोन्ही पायांवर सारखें वजन ठेवून उभें राहावें. त्यामुळें त्याला दोन्ही बाजूंना चटकन् वळतां येईल. गोलंदाजानें स्टार्ट घेतल्यापासून तो फलंदाज चेंडू खेळेपर्यंत या क्षेत्ररक्षकाची नजर सतत त्या चेंडूवर राहिली पाहिजे. फाईन लेग स्लिपलाहि ही गोष्ट लागू आहे. यष्टिरक्षकाच्या थोडया उजव्या बाजूस व जरा मागें त्यानें उभें राहावें.

सेकंड स्लिप, थर्ड स्लिप व गली येथील क्षेत्ररक्षकांनी फर्स्ट स्लिप-प्रमाणेंच वांकून व दोन्ही पायांवर सारखें वजन देऊन उभें राहावें. मात्र या सर्वांनी चेंडूकडे किंवा गोलंदाजाकडे लक्ष न देतां फलंदाजाच्या बॅटीवरच लक्ष केंद्रित करावें. चेंडू टाकणाऱ्या गोलंदाजाकडे पाहून मग फलंदाजाकडे बघायला मानेची जी हालचाल करावी लागते तेवढयांत चेंडू फलंदाजापाशीं पोंचलेला असतो. आणि बॅटीवरून आलेला झेल अगर चेंडू पकडणें कठीण जातें कारण त्याला. क्षणभर कां होइना, पण उशीरा चेंडू दिसतो. झेल सुटण्यास तेवढा किंचित् उशीर पुरेसा असतो !

लेगकडील जवळच्या (क्लोज् इन्) क्षेत्ररक्षकांनाहि ही गोष्ट लागू आहे. यांनी आणखी हें लक्षांत ठेवावें कीं गोलंदाजाच्या हातांतून चेंडू सुटेपर्यंत त्यांनी कोणत्याहि परिस्थितींत बोलूं नये. अशी आधींच हालचाल केल्यामुळें सोपे सोपे झेल सुटलेले मी पाहिले आहेत. स्लिप-क्षेत्ररक्षकांनी किती दूर उभें

राहावें तें विकेटच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. पेस (वेग), बाउन्स (चेंडूची उशी किंवा उसळी) वगैरे गृहीत धरून यष्टिरक्षक साधारणतः याविषयीं मार्गदर्शन करूं शकतो. याबाबत त्याचा सल्ला जरूर घ्यावा.

कव्हर पॉइंट, एक्स्ट्रॉ कव्हर व शॉर्ट मिड् विकेट येथील क्षेत्ररक्षकांनी मैदान (औटफील्ड) कसें आहे आणि चेंडू त्या जमिनीवर किती वेगानें येईल हें अंदाजून त्या बेतानें उभें राहावें. अर्थात मुख्य हेतु फटके अडविण्याचा असला तरी त्या बाजूनें सिंगल (एकेरी धांव) काढूं न देण्याचाहि उद्देश असतोच. अशा क्षेत्ररक्षकांनी निष्कारण एकेक धांव दिली तर गोलंदाजाची निराशा होते. कारण एकामागून एक असे सहा चेंडू एकाच फलंदाजाला टाकणें त्या परिस्थितींत त्यास जमत नाहीं, आणि त्याचा 'प्लॅन ऑफ अटॅक' निष्फळ ठरतो. कव्हर पॉइंट व शॉर्ट थर्ड मॅन या क्षेत्ररक्षकांनी हें ध्यानांत ठेवावें कीं त्यांच्या बाजूस मारलेला फटका हा Slice करून मारला गेला असल्यामुळें उजवीकडून डावीकडे वळेल. विशेषतः फटका उंचून आला असेल तर पहिला टप पडतांच तो अशा रीतीनें वळेल. स्क्वेअर लेग व त्याच्यामागें हाच चेंडू विरुद्ध दिशेनें म्हणजे डावीकडून उजवीकडे जाईल.

बाउंडरीपाशीं क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू धांवण्यांत चपळ असले पाहि-जेत. कारण त्यांना पुष्कळदां २० ते ३० यार्डस् अंतर धांवून फटके अडवा-यचे असतात. असें धांवत जाऊन, धांवतां धांवतां खालीं वांकून एका हातानें चेंडू झपाट्यानें, विजेच्या गतीनें उचलून यष्टिरक्षकाकडे अचूक व वेगानें फेकण्यांत जी मजा आहे ती इतर कशांत नाहीं ! प्रेक्षकांकडून सतत टाळ्या मिळविणारी ही हमखास जागा आहे. या क्षेत्ररक्षकाचा 'थ्रो' तसाच साम-र्थ्यवान असला पाहिजे. तो 'थ्रो' यष्टिरक्षकाच्या नेमका हातांत गेला पाहिजे. हें अंतर जास्त असलें तर त्यानें 'एकटप्पी' पण वेगाचा 'थ्रो' करावा. विमानाप्रमाणें आकाशांत भ्रमंती करून आलेल्या थ्रोपेक्षां हा थ्रो जोराचा असतोच. शिवाय, यष्टिरक्षकासहि तो घेणें सोपें असतें.



१. विकेट कीपर
२. फर्स्ट स्लिप
३. सेकंड स्लिप
४. थर्ड स्लिप
५. गली
६. पॉइंट
७. कव्हर पॉइंट
८. अेक्स्ट्रॉ कव्हर
९. बॉलर
१०. मिड् ऑन
११. मिड् विकेट
१२. सिली मिड ऑफ
१३. स्क्वेअर लेग
१४. लेग् स्लिप
१५. लेग् स्लिप २
१६. लाँग लेग
१७. डीप स्क्वेअर लेग
१८. डीप मिड विकेट
१९. लाँग ऑन
२०. लाँग ऑफ
२१. कव्हर पॉइंट
२२. थर्ड मॅन

× अंपायर

प्रत्येक क्षेत्ररक्षकानें थ्रो करतांना तो यष्टिरक्षकाच्या कंबरेइतक्या उंचीवर त्याला मिळेल अशा रीतीनें स्टंपवर टाकावा. यष्टिरक्षकाच्या पायाच्या दिशेनें टाकलेला थ्रो त्यास घ्यावयाला त्रासदायक वाटतो. त्या कामीं त्यास जादा श्रम पडतात. सर्वांत जास्त काम यष्टिरक्षकावर पडतें आणि तो संघाचा अर्धा भाग मानला जातो. त्याला शक्य तों कमी श्रम पडतील याची काळजी प्रत्येकानें घ्यावी.

आपणांकडील मैदानें साधारणतः अगदीं सारखीं सपाट नसतात. जरा उंचसखल असतात. ही अडचण ध्यानीं ठेवूनच प्रत्येकानें चेंड बरोबर अडविला पाहिजे.

धांवत येऊन चेंडू अडवितांना, चेंडू उजव्या पायापाशीं व सर्व वजन त्या पायावर असतांनाच अडवावा. म्हणजे थ्रो करतांना वजन चटकन् डाव्या पायावर बदलतां येऊन थ्रो लौकरांत लौकर यष्टिरक्षकाकडे टाकतां येईल. चेंडू अडवितांना मन शांत, अचल ठेवलें पाहिजे. धांवचीत करण्याची संधी असतांना तर याची फार आवश्यकता आहे. चेंडू अडवतांअडवतांच अंदाज करायला पाहिजे कीं ' सहज धांवचीत ' करतां येईल कीं ' क्लोज् फिनिश ' होईल. ' सहज धांवचीत ' असा संभव असेल तर थ्रो वेगानें यष्टिरक्षकाच्या वा गोलंदाजाच्या हातीं टाकावा. ' क्लोज फिनिश ' ची शक्यता असेल तेव्हां थेट यष्टीवर थ्रो करण्याचा प्रयत्न करावा.

आपल्या क्रिकेटमध्यें (प्रथम श्रेणी ते थेट क्लब क्रिकेटपर्यंत) एक दोष नेहमीं आढळतो, तो म्हणजे क्षेत्ररक्षणांत ' कव्हरिंग ' न करणें. जेव्हां जेव्हां यष्टिरक्षकाकडे किंवा गोलंदाजाकडे चेंड फेकला जातो तेव्हां तेव्हां त्यांच्या जवळील क्षेत्ररक्षकानें त्यांच्यामागें जाऊन त्यांना ' कव्हर ' करावें. पुष्कळ क्षेत्ररक्षक असें करतात हें खरें, पण यष्टिरक्षक व स्वतः यांच्यांत ते फारसें अंतर ठेवीत नाहींत. त्यामुळें यष्टिरक्षकाच्या हातास लागून चेंडू वळला तर तो त्यांना अडवितां येत नाहीं, अगर कांहीं वेळां तो दिसतहि नाहीं. म्हणून या दोघांत किमान १० यार्डांचें अंतर असावें.

दुसरी गोष्ट म्हणजे एकादी धांव होण्याचा संभव असतांना मिड ऑफ वा मिड ऑन् क्षेत्ररक्षकानें त्यांच्या विरुद्ध बाजूस फटका मारला असल्यास लगेंच गोलंदाजीच्या बाजूकडील यष्टीपाशीं येऊन 'थ्रो' घेण्यास तयार असावें. आपल्याकडील क्षेत्ररक्षक जवळजवळ हें करीतच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. यास अपवाद एकच म्हणजे मुंबईचा वासू परांजपे हा खेळाडू. हा कोठेंहि क्षेत्ररक्षण करीत असला तरी धांवतधांवत गोलंदाजापाशीं जाऊन पोंचतो आणि कितीहि अवघड वा जोराचा थ्रो असला तरी अचूक अडवितो. गोलंदाजाच्या हातांना दुखापत होण्याचा संभव त्यामुळें कमी होतो.

आणखी एक गोष्ट मी अनेकदां पाहिली आहे कीं चांगले चांगले क्षेत्ररक्षक चेंडू बरोबर अडवतील पण गोलंदाजाकडे थ्रो करतांना चेंडू नेमका त्याच्या हातांत जाईल अशा रीतीनें टाकणार नाहींत. खरें म्हणजे चेंडू असा टाकला पाहिजे कीं तो गोलंदाजास न वांकतां सहज घेतां आला पाहिजे. हें अवघड आहे असें नाहीं. पण आळस नडतो ! हातांत चेंडू आला तरी तो गोलंदाजाकडें कसातरी टाकायचा, मग त्याला खालीं वांकावें लागलें तरी पर्वा नाहीं अशी अनिष्ट वृत्ती पुष्कळदां दिसून येते ! गोलंदाजास किमान त्रास पडूं देऊन त्यास ताजेतवानें ठेवणें हें संघाच्या हिताचें आहे हें प्रत्येक क्षेत्ररक्षकानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

कर्णधारानें एकदां क्षेत्ररचना केली कीं तीच अखेरची हा समज चुकीचा आहे. प्रत्येक चेंडू टाकून झाला म्हणजे किंवा दुसरा चेंडू टाकला जाण्यापूर्वी क्षेत्ररक्षकानें कप्तानाकडे पाहिलें पाहिजे. कारण, फलंदाजास सुगावा लागूं न देतां त्याला अनेकदां क्षेत्ररक्षणांत बदल करायचे असतात. अशा वेळीं कर्णधारानें टाळी वाजवून सर्वांचें लक्ष वेधण्यांत मुळींच अर्थ नसतो. म्हणून हा मुद्दा प्रत्येक खेळाडूनें लक्षांत ठेवावा.

पुष्कळदां गोलंदाज स्वतःच क्षेत्ररचना बदसतो. अशा वेळीं कप्तानाकडे पहात जा आणि त्याचें लक्ष या बदलाकडे आहे किंवा नाहीं तें बघा. त्याचें लक्ष नसेल तर तें वेधून त्याची संमति मिळवा. कारण, कर्णधार हाच

क्रीडांगणावर एकमेव नेता आहे. त्यानें रचलेल्या व्यूहांत बदल करण्याचा अधिकार केवळ त्याचाच आहे. तो बदल त्याच्या लक्षांत आल्यावर त्यानें तुम्हास परत पूर्वीच्या जागीं पाठविलें तर गोलंदाजाकडे बोट दाखवूं नका ! त्यामुळें कर्णधरास मनस्ताप होईल. कर्णधार हा क्रीडांगणावर सर्वाधिकारी आहे. त्याचा शब्दच अखेरचा मानला पाहिजे.

झेल पकडतांना साधारणपणें क्षेत्ररक्षकानें शारिराचा समतोल राखला पाहिजे. मुख्य गोष्ट म्हणजे त्याचें डोकें, मानेपासून वरचा भाग अगदीं स्थिर असावा. त्यामुळें चेंडूवरील नजर चळत नाहीं. डोकें हललें कीं नजर चळलीच समजा ! नजर चळली कीं स्लिप्स वा शॉर्ट लेग येथील झेल पकडणें फारच कठीण. तीच गोष्ट उंचावरून आलेल्या झेलांची. ऑस्ट्रेलियन क्षेत्ररक्षक उंच झेल डोळ्यांच्या उंचीवर ('आय लेव्हल') बहुधा पकडतात. भारतीय व इंग्रज खेळाडू असे झेल छातीपाशीं हातांचा 'कप' करून पकडतात. झेल कसाहि पकडला तरी मुख्य तत्त्व तेंच. चेंडूवर सतत नजर ठेवणें आणि समतोल राखून उभें राहणें.

७

यष्टिरक्षण

एकदां एका सुविख्यात यष्टिरक्षकास कोणीतरी विचारलें, "काहो, यष्टिरक्षक होणेंच तुम्हीं कां पसंत केलें ?"

तो थंडपणें उत्तरला, "यष्टिरक्षक हे जन्मतःच मूर्ख असतात, मी देखील तसाच होतों !"

या तऱ्हेवाईक उत्तराचें कारण म्हणजे अंपायरच्या कामाप्रमाणेंच यष्टिरक्षकाचें काम कटकटीचें आहे. यष्टिरक्षकानें झेल पकडला वा विटीचीत केलें तर "त्यांत काय मोठंसं ? त्यानें तें करायलाच पाहिजे. मग यष्टिरक्षक झाला कशाला ?" असे उद्गार ऐकूं येतात ! पण फलंदाजास बाद करण्याची एकादी संधी त्यानें घालवली, मग ती कठीण असो वा सोपी असो, कीं त्याच्यावर शिव्याशापांचा वर्षाव होतो व कांहीं वेळां संघामधून त्याला अर्धचंद्र मिळतो ! आतां हें सर्व माहीत असूनहि जो माणूस यष्टिरक्षकाचे 'ग्लोव्हज्' चढवतो तो मूर्ख नव्हे तर कोण ?

डॉन् ब्रॅडमन् यांना लहानपणापासून यष्टिरक्षक होण्याची इच्छा होती, पण अनेक कारणांमुळें ती इच्छा अपुरी राहिली. यांत त्यांचा मुख्य हेतु असा कीं मैदानावर उतरल्यावर प्रत्येक चेंडूवर खेळण्याची आपणास संधी मिळावी. यष्टिरक्षकास नेमकें हेंच करावें लागतें. गोलंदाजानें 'स्टार्ट' घेतल्यापासून तो परत तो चेंडू त्याजकडे जाईपर्यंत यष्टिरक्षकास त्या चेंडूवर घारीप्रमाणें तीक्ष्ण नजर ठेवावी लागते. हें सतत लक्ष केंद्रित करणें व एकसारखी 'उठबस' यामुळें त्या माणसावर केवढा जबर ताण पडत असेल याची कल्पना करा. पण यांत त्याला फायदेहि होतात. सर्व तऱ्हेचे फलंदाज कोणत्या चेंडूवर कसे खेळतात हें त्यास अगदीं जवळून पहायला मिळतें.

तसेंच चाणाक्ष यष्टिरक्षक प्रतिपक्षांतील प्रत्येक फलंदाजाची 'शक्ति-स्थळें व मर्मस्थळें' (स्ट्रॉंग पॉइंट्स व वीक पॉइंट्स) बरोबर पाहून त्या विषयीं आपल्या कर्णधारास व गोलंदाजांना माहिती देईल आणि प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करण्यास महत्त्वाची मदत करील.

यष्टिरक्षकाचें मुख्य काम म्हणजे यष्टीच्या मागें आलेले चेंडू अडविणें आणि झेल उडाल्यास पकडणें अगर स्टंपिंगची संधी आल्यास ती साधणें. चेंडू अडविण्यासाठीं दरवेळीं त्यानें चेंडूच्या बरोबर मागें राहिलें पाहिजे. चेंडू ग्लोव्हज्मध्यें पकडतांना बोटांची दिशा जमिनीकडे असली पाहिजे.अगदीं 'वाइड' चेंडू असल्यास हा नियम त्याला पाळतां येणार नाहीं हें उघड आहे. सर्वसाधारण चेंडूविषयीं हें लिहिलें आहे.

विकेटच्या अगदीं जवळ उभें राहतांना चेंडू ऑफ दांडीवर 'वाइड' आला तर उजवा पाय मागें न घेतां तो सरळ त्याच रेषेंत घ्यावा. कारण तो पाय मागें नेला तर तुम्ही विकेटपासून दूर जाल आणि 'स्टंपिंग चान्स' असला तर 'बेल्स' उडविणें फार कठीण जाईल. तसेंच, लेगच्या बाजूस चेंडू अडवितांना, डावा पाय मागें (लेग स्टंपवर) किंवा सरळ रेषेंत न ठेवतां तो जरा पुढेंच घेतला तर तुम्हीं तो चेंडू सहज अडवूं शकाल. चेंडू हातांत

बसला नाहीं तरी तुमचें शरीर चेंडूच्यामागें असल्यामुळें चेंडू तेथेंच अडल व 'बाईज्' धांवा मिळणार नाहींत.

नवीन चेंडूवर यष्टिरक्षकानें साधारणपणें मागेंच राहावें. तो चेंडू स्विंग होत असतो. त्यामुळें मागें राहिल्यानें, चेंडू कोठें येईल हें अजमावतां येऊन तो अडवितां येतो.

दुसरें असें कीं नव्या चेंडूवर स्टंपिंगपेक्षां झेल जास्त येतात. चांगला यष्टिरक्षक फर्स्ट स्लिप वा फाईन लेग स्लिप येथील झेल सहज पकडूं शकतो. पण कोठें उभें राहायचें हें त्याचें त्यानेंच ठरवावें. अनुभवानें त्याला या गोष्टी समजतील. एक गोष्ट मात्र खरी कीं त्यानें यष्टीपासून अगदीं मागें किंवा अगदीं जवळ असेंच उभें राहिलें पाहिजे. 'नो मॅन्स लॅंड' मध्यें उभें राहून चालणार नाहीं. तें जमायचेंच नाहीं.

जवळ किंवा दूर उभें राहिलें तरी त्याचा पवित्रा असा पाहिजे कीं त्याला गोलंदाज स्पष्टपणें दिसेल. जवळ उभें राहतांना इतकें जवळ उभें राहावें कीं (स्टंपिंगची संधी असेल तरच) बेल्स सहज उडवितां येतील. दुसरें म्हणजे चेंडूबरोबर उठणें. कांहीं यष्टिरक्षक आधींच उठतात. त्यामुळें चेंडू 'लो' (खालीं) राहिला तर त्यांना अडवितां येत नाहीं. आपल्या विकेट्सवर बहुधा असें होत नाहीं. पण इंग्लंडांतील विकेट्सवर यष्टिरक्षकांची खरी कसोटी लागते. निरनिराळ्या मैदानावर चेंडू निरनिराळ्या तऱ्हेनें उडतो, म्हणून चेंडूबरोबर उठणें ही बाब इंग्लंडमध्यें अतिशय महत्त्वाची ठरते.

गोलंदाजानें हातीं चेंडू घेतल्यापासून यष्टिरक्षकानें सतत त्याच्याकडे लक्ष दिलें पाहिजे. प्रत्येक गोलंदाजाची चेंडू धरण्याची पद्धत वेगवेगळी असते. औट स्विंगर टाकावयाची पकड (ग्रिप) वेगळी, इन् स्विंगरची पकड निराळी, ऑफ ब्रेकची वेगळी आणि 'फास्टर वन' (वेगवान चेंडू) ची निराळी. गोलंदाजाची पकड पाहिली म्हणजे कसला चेंडू तो टाकणार त्याची

कल्पना येते व त्याप्रमाणें चेंडू अडविण्याची यष्टिरक्षकास तयारी करतां येते.

मात्र कांहीं गोलंदाज पक्के वस्ताद असतात. चेंडू टाकतां टाकतांच ते बेमालूमपणें पकड बदलून वेगळा चेंडू टाकतात. म्हणून चेंडू कसला आहे तें यष्टिरक्षकानें काळजीपूर्वक पहावें. इन स्विंगर चेंडू असला कीं लगेच लेग–बाजूस जावें. गुगलीच्या बाबतींत हेंच. अर्थात चेंडूचा टप्पा कोठें पडणार हें पाहिलें पाहिजे. इन स्विंगर, गुगली किंवा ऑफ ब्रेक मधल्या दांडीवर आला तर यष्टिरक्षकानें लगेच लेग–बाजूस गेलें पाहिजे व तो चेंडू पकडण्याच्या तयारींत राहिलें पाहिजे. यामुळें तो चेंडू अडवितां येईलच, शिवाय फलंदाजाच्या बॅटीचा ओझरता स्पर्श (कट) लागून जो चेंडू जरा तिरका जातो तोहि अडविणें शक्य होईल.

चेंडू आपल्या हातांत सहज बसेल अशा रीतीनें पकडावा. इंग्रजींत ज्याला ' गिव्ह इन् ' म्हणतात तसें केल्यास हें सोपें जाईल. हातांत चेंडू नीट बसल्याची खात्री झाल्यावरच ' स्टंप ' करा. नाहींतर स्टंपिंगच्या घाईत चेंडू हातावर बसून उडेल आणि ती सुसंधी फुकट जाईल. स्टंपिंग करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवा. चेंडू यष्टीच्या मागें येईपर्यंत आपल्या शरि-राचा कोणताहि भाग–ग्लोव्हज् तर नाहींच नाहीं––यष्टीच्या पुढें जातां कामा नये.

क्षेत्ररक्षकांकडून आलेले सर्व ' थ्रो ' शक्य तों पहिल्या टप्यालाच हातांत बसतील (फुल पिच) असे घ्या. धांवचीत करण्याची संधी असल्यास विकेट सोडून पुढें धांवत जाऊन ' थ्रो ' पकडावा. असें केल्यानें यष्टिरक्षकास ' थ्रो ' नीट दिसतो. शिवाय चेंडू जमिनीवर आदळून खराब होतो, तसा लवकर खराब होणार नाहीं. चेंडू गोलंदाजाच्याकडे परत देतांना, त्यास वांकावें न लागतां तो झेलतां येईल असाच टाका. तुम्हीं यष्टीपासून बरेच मागें असाल तर जवळच्या क्षेत्ररक्षकाकडे चेंडू द्या; तो गोलंदाजाकडे बरोबर चेंडू परत करील.

जेव्हां जेव्हां धांवचीत करण्याचा मोका असेल किंवा धांव होण्याची शक्यता असेल तेव्हां तेव्हां चपळाईनें यष्टीपाशीं या. यष्टीच्या पुढें केव्हांहि चेंडू घेऊं नका. कधीं कधीं क्षेत्ररक्षकानें फेकलेला चेंडू थेट यष्टीला लागला तरच फलंदाज धांवचीत होण्याचा संभव असतो.

यष्टिरक्षकाचें काम किती जिकीरीचें, श्रमाचें व सावधपणाचें असतें तें तुमच्या लक्षांत आलें असेलच. म्हणून तो संपूर्णपणें तंदुरुस्त असणें अत्यावश्यक आहे. सामन्याच्या सुरुवातीस तो जेवढा ताजातवाना असतो तेवढा संध्याकाळपर्यंत असायला पाहिजे.

८

क्रिकेटरनें काय करावें ? काय करूं नये ?

फलंदाजाचीं पथ्यें :--

(१) बॅट हातांत बरोबर राहील व सहज पेलतां येईल अशीच घ्या. म्हणजे कोणताहि फटका हवा तसा मारतां येईल. एवढ्याचसाठीं दुसऱ्याची बॅट उसनी घेऊन वापरूं नका. कारण तिचें वजन व तोल तुम्हांस योग्य असेलच असें नाहीं. त्यामुळ तुमच्या खेळावर वाईट परिणाम मात्र होईल.

(२) शक्य तों लवकर स्थिर होऊन धांवा मिळवण्याचा प्रयत्न करा. याचा अर्थ असा नव्हे कीं दर वेळीं एका तासांत १०० धांवा करायच्या हेतूनें खेळलें पाहिजे ! जसा खेळ संघास फायदेशीर ठरेल त्याच प्रकारची फलंदाजी करा.

(३) निर्जीव (लूज्) चेंडू आला कीं सणसणीत फटका लगावून तो जरूर सीमापार करा. मग तो पहिलाच चेंडू कां असेना !

(४) ' रनिंग बिटवीन दि विकेट्स् ' वर सतत मेहनत करा. पहिली धांव जर वेगानें धांवून काढलीत, तर ज्या फटक्यांत एकच धांव होती असें तुम्हांस वाटलें त्यांत दुसरी धांव तुम्ही काढूं शकाल.

(५) शक्य तों सर्व फटके भुईसरपटत मारावे हें योग्यच. पण जर ' डीप औट फील्ड ' मध्यें एकहि क्षेत्ररक्षक नसेल तर त्या जागीं उंचावरून चेंडू मारण्यास भिऊं नका !

(६) पंचांनी तुम्हांस बाद ठरविलें कीं लगेच तंबूचा रस्ता सुधारा ! त्या निर्णयाबद्दल कोणत्याहि प्रकारें नापसंती असर राग दाखवूं नका.

गोलंदाजाचीं पथ्यें :—

(१) एखाद्या पिचवर चेंडू जास्त फिरकी घेत असेल तर तो नियंत्रित करण्याचा प्रयत्न करा. ' ब्रेक ' जेवढा मोठा तेवढा फलंदाजास सोपा कारण तो चेंडू त्याच्या बॅटीला लागणारच नाहीं.

(२) सतत यष्टीवर चेंडूफेक करणें हें गोलंदाजाचें मुख्य कर्तव्य खरें. पण पुष्कळदां यष्टीबाहेर गोलंदाजी करणेंहि हिताचें ठरतें. तुमच्या गोलंदाजीवर उडणारा झेल पकडायला तुमचे दहा साथीदार जय्यत तयार आहेत हें लक्षांत ठेवा.

(३) तुमच्या संघाची अवस्था वाईट असली तरी केव्हांहि ' निगेटिव्ह बोलिंग ' (नकारात्मक गोलंदाजी) करूं नका. तशा गोलंदाजीवर धांवा होऊं शकत नाहींत हें खरें, पण तीवर फलंदाज बाद होत नाहीं हेंहि तेवढेंच खरें.

(४) फलंदाज बाद आहे अशी तुमची खात्री असेल तेव्हांच ' अपील ' करा. पंचास विशेष माहिती नाहीं असा मोका साधून अपील करूं नका. तुमच्या संघांतील फलंदाजावरहि कदाचित् असाच प्रसंग ओढवेल.

क्षेत्ररक्षकांचीं पथ्यें :--

(१) क्षेत्ररक्षण करतांना सतत जय्यत तयारींत व सावध राहा. फलंदाज कोठें फटका मारील याचा आधींच अचक अंदाज करायला येणें ही क्षेत्ररक्षकाच्या यशाची गुरुकिल्ली आहे,

(२) क्षेत्ररक्षण करतांना चेंडू अडविण्यासाठीं शक्य तों पायांचा उपयोग करूं नका. हातांनीं अडविलेला चेंडू तुम्हांला लौकरांत लौकर यष्टि-रक्षक वा गोलंदाज यांजकडे फेंकता येतो आणि अशा रीतीनें एक धांव वांच-वितां येते.

(३) झेल आपल्याकडे येण्याची वाट पहात गप्प बसूं नका. तुम्हीं नेहमीं जय्यत तयार व सावधान असाल तर आलेला झेल तुम्हांस चटकन् दिसेल व लगेंच पकडतां येईल.

(४) झेल सुटला तरी हळहळत बसूं नका किंवा त्याचीं कारणें सांगूं नका! त्यावर विचार करीत असतांना दुसरा झेल आला तर तो तुमच्या हातून नक्कीच सुटेल.

(५) यष्टिरक्षकाकडे बिनचूक व वेगवान् 'थ्रो' करण्याचा रोज सराव करा. तुमच्या अशा थ्रोमुळें एखादा उत्कृष्ट फलंदाज धांवचीत झाला तर तुमचा संघ विजयी होण्यास तुमचा महत्त्वाचा हातभार लागेल.

(६) तुम्हीं कोठेंहि उभे असलांत तरी पायचीत बाबतचें अपील करूं नका! फलंदाज पायचीत आहे कीं नाहीं हें फक्त गोलंदाज व यष्टिरक्षक हे दोघेच जाणूं शकतात.

(६) क्षेत्ररक्षण करतांना आपण कोणावर तरी मेहेरबानी करीत आहोंत अशा रीतीनें वागूं नका. चांगला क्षेत्ररक्षक हा संघाचा आधारस्तंभ असतो हें लक्षांत ठेवा.

यष्टिरक्षकाचीं पथ्यें :—

(१) उगीचच परत परत 'बेल्स्' उडवूं नका. त्या नीट बसविण्यासाठीं पंचाला पुनः पुनः धांवत यावें लागतें. कितीहि सज्जन व शांत डोक्याचा पंच असला तरी तो यामुळें कदाचित् तुमच्याविरुद्ध पूर्वग्रह करून घेईल.

(२) केंव्हांहि चेंडूवर झडप घालून तो पकडूं नका. 'गिव्ह इन्' पद्धतीनेंच तो ग्लोव्हज्मध्यें बरोबर बसेल.

(३) झेल अगर स्टंपिंग यांची संधी आली तर प्रथम चेंडूवरची नजर कायम ठेवा. चेंडू नीट हातांत असल्यावरच बेल्स् उडवा आणि अपील करा. उगाच घाई केल्यानें असे मोके हुकतात.

(४) तुमच्या मतें फलंदाज बाद असेल अशा वेळींच स्टंपिंग वा झेल यांचें अपील करा. विनाकारण अपील करून पंचाचें मन कलुषित करूं नका.

(५) तुमच्या संघाचे गोलंदाज कशी गोलंदाजी करीत आहेत तें काळजीपूर्वक पहा. तसेंच त्यांची गोलंदाजी फलंदाज कसे खेळतात तें बारकाईनें पहा. चांगले कर्णधार आपल्या यष्टिरक्षकाचा सल्ला विचारतात. अशा वेळीं हें अवलोकन उपयोगी पडतें.

९

धांवा काढण्याची कला

(रनिंग बिट्वीन् दि विकेट्स्)

'रनिंग् बिट्वीन् दि विकेट्स्' ही अवघड कला आहे. क्रिकेटचें तें महत्वाचें अंग आहे. ऑस्ट्रेलियन खेळाडूंनीं या अंगावर खूप परिश्रम घेऊन ती कला आत्मसात केली आहे. इंग्रज खेळाडूदेखील या कलेंत तरबेज आहेत. याउलट, आपल्याकडील बहुतेक खेळाडू या अंगाला किरकोळ समजतात आणि तिकडे विशेष लक्ष देत नाहींत. हेमू अधिकारी, रुसी मोदी व विनू मंकड जेव्हां जेव्हां एकत्र येत तेव्हां तेव्हां ते 'शॉर्ट' एकेरी धांवा 'चोरून' क्षेत्ररक्षकांची दाणादाण उडवीत आणि खेळांत अपूर्व रंग व मजा भरीत. हेच खेळाडू इतरांबरोबर भागीदारी करीत तेव्हां तो भागीदार या जलद धांवा घेण्यांत कमी पडला तर त्यांना तें आवडत नसे, आणि याचा थोडाफार अनिष्ट परिणाम त्यांच्या खेळावर होत असे !

असाच एक मजेदार प्रसंग मला आठवतो. भारतीय क्रिकेट संघ १९५२ सालीं इंग्लंडमध्यें दौऱ्यावर असतांनाची गोष्ट. यॉर्कशायरबरोबर आमचा सामना चालू होता. त्यांचे गोलंदाज जॉनी बॉईल्, ब्रायन् क्लोज् इत्यादि फारच दमदार व पल्लेदार चेंडूफेंक करीत होते. आम्हांस धांवा तर लौकर लौकर करायच्या होत्या. हेमू अधिकारी व पॉली उम्रीगर यांची जोडी जमली होती. हेमू जलद धांवा चोरण्यांत वाकबगार तर पॉली धांव सुरक्षित असल्याशिवाय ती न घेणारा ! हेमू त्याला म्हणाला, ' पॉली, धांव चोरायला जरा तयार राहात जा कीं ! "

त्यावर पॉली उत्तरला, " बाबा ! मला धांवचीत व्हायची हौस नाहीं ! तुला धांवाच पाहिजेत ना ! जरा थांब. चौकार अन् षट्कार लगावून मी धावांचा नुसता पाऊस पाडतों ! "

आणि खरोखरीच, पॉलीनें चौफेर फटक्यांची आतषबाजी करून स्वतःचें शतक फडकावलें. हें सांगायचा मुद्दा असा कीं उम्मीगर उत्कृष्ट खेळाडू असूनसुद्धां, चांगल्या रीतीनें केलेल्या ' रनिंग बिट्वीन दि विकेट्स् ' मध्यें थोडाहि धोका नसतो हें तेव्हां त्यास माहीत नव्हतें.

असाच पण जरा वेगळा दुसरा एक प्रसंग. भारत–पाक यांच्या कानपूर कसोटी सामन्यांत नरी कॉंट्रॅक्टर व जयसिंह ही सलामीची जोडी खेळत होती. पाक गोलंदाजी मारायला अवघड जात होती. त्यामुळें, अलीकडे मराठी वृत्तपत्रांनी रुळवलेला ' कूर्मगति ' खेळ सुरू होता ! उपाहाराच्या सुटींत नरी माझ्याकडे आला व म्हणाला, " अरे माधव, आम्ही काय करणार ? धांवा काढणार तरी कशा ? गोलंदाजी कशी पडतेय पाहिलंस ना ? "

मी त्याला म्हणालों, " तुझं सारं म्हणणं मला मान्य आहे पण जरा ' प्लेसिंग ' करून शॉर्ट सिंगल्स् घे ना ! क्षेत्ररक्षकांकडे जोरांत फटके मारण्याऐवजीं जरा हळू प्लेसिंग करून एकेक धांव काढ. "

नरीला माझें म्हणणें पटलें. त्याप्रमाणें त्या जोडीनें खेळाची पद्धत बदलली आणि खेळांत चैतन्य निर्माण झालें. जुन्या पिढींतील नामवंत क्रिकेट-पटू प्रा. दि. ब. देवधर हेहि या कलेंत प्रवीण होते. या कौशल्यामुळें फलंदाजास पुष्कळ धांवा मिळूं शकतात आणि सामना जिकण्यासाठींहि अशा धांवांचा कांहीं वेळां उपयोग होतो. फलंदाजी करणाऱ्या संघाच्या दृष्टीनें आणखी एक फायदा म्हणजे प्रत्येक धांवेस फलंदाज बदलत असल्यामुळें गोलंदाज व क्षेत्ररक्षक यांची त्रेधा उडते. निष्णात् गोलंदाज फलंदाजास बाद करण्यासाठीं विविध युक्त्या प्रयुक्त्या योजीत असतो. पण दर चेंडूस निर-निराळ्या तऱ्हेनें खेळणारे फलंदाज त्यास भेटले तर त्याच्या हिकमती वाया जाऊन तो जरा निराश, नाउमेद बनतो !

'रनिंग् बिटवीन्' ला एवढें महत्व आहे तर त्याच्या खुब्या तरी काय ? पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे अनुभवावर आधारलेली अनुमान-शक्ति (जज्मेंट). पुष्कळ सामनें खेळून व अनेक अनुभवी खेळाडूंचा खेळ पाहून कोणती धांव धोक्याची व कोणती सुरक्षित हें समजूं शकतें.

याचविषयीं आणखी कांहीं महत्वाच्या गोष्टी :—

बोलावणें (कॉलिंग्)

(१) क्रीडांगणावर दोन फलंदाज खेळत असतात. धांव काढण्यापूर्वी त्यानीं एकमेकास ओरडून सूचना देणें यालाच 'कॉलिंग्' म्हणतात. तीन प्रकारचे 'कॉल्स' प्रसंगानुरूप द्यावेत: यस, नो व वेट. यांचा अर्थ उघड आहे.

(२) जेव्हां फटका विकेटच्या पुढें मारला असेल तेव्हां फटका मारणाऱ्या फलंदाजानें 'कॉल' दिला पाहिजे. जेव्हां फटका विकेटच्या मागें जातो त्या वेळीं दुसऱ्या टोकाचा फलंदाज (नॉन स्ट्रायकर) यानें 'कॉल' दिला पाहिजे.

याचें कारण उघड आहे. यष्टीमागें चेंडू जातो तेव्हां तो खेळणाऱ्या (स्ट्रायकर) फलंदाजास दिसत नाहीं. त्यानें मागें वळून बघायचें तर त्यांत वेळ वांया जातो. यष्टीपुढें मारलेल्या फटक्यांत किती जोर आहे तें फटका मारणाऱ्यास माहीत असतें. म्हणून यावेळीं 'कॉल' करण्याची जबाबदारी त्याची असते. ऑन साइडला फटका मारला जातो तेव्हा नॉन स्ट्रायकरनें मागें वळून न पहातां स्ट्रायकरच्या कॉलप्रमाणें वागावें.

(३) दोन किंवा जास्त धांवा काढणें शक्य असतें त्यावेळीं दोन फलंदाज पहिली धांव काढतांना एकमेकांस भेटतात (क्रॉस करतात) तेव्हां त्यांनीं एकमेकांस तशी जाणीव द्यावी. ही सूचना हलक्या आवाजांत (त्याला एकट्यालाच ऐकूं जाईल अशी) द्यावी. इतर क्षेत्ररक्षकांना तुमचा उद्देश समजतां कामा नये.

(४) जेव्हां जेव्हां धांव काढावयाचें तुम्ही नाकारतां तेव्हां तेव्हां तुमच्या साथीदारास तत्काळ व स्पष्ट आवाजांत मोठ्यानें सांगा.

(५) धांव काढायची असें ठरल्यावर मग बिलकुल धरसोड नको. मग सरळ धांवत जा. अनुभवानें तुमच्या लक्षांत येईल कीं असें धांवल्यानें १० पैकीं ९ वेळां धांवचीत न होतां तुम्हीं धांव काढूं शकतां.

(६) क्षेत्ररक्षक नीट अडवूं न शकलेल्या चेंडूकडे नीट लक्ष द्या. तो चेंडू क्षेत्ररक्षकाच्या आंवाक्याबाहेर असला तरच धांव घ्या. नाहींतर सरळ 'नो' म्हणून सांगा. तो चेंडू क्षेत्ररक्षकाच्या जवळच असला तर धांवचीत होण्याचा निश्चित धोका असतो.

धांवा काढतांना

धांवा काढतांना या गोष्टी लक्षांत ठेवा:— (१) गोलंदाज ज्या बाजूनें

चेंडूफेक करतो त्याच्या अगदीं विरुद्ध दिशेस ' नॉनस्ट्रायकर ' नें उभें राहावें. ' वाईड बॉलच्या ' रेषेपलीकडे त्यानें उभें राहावें व धांव घेतांना तसेंच सरळ धांवावें. धांव काढतांना फलंदाज विकेटबाहेरून पण गोलंदाज ज्या टोकाकडून चेंडूफेंक करतो त्य टोकाच्या दिशेनेंच धांवेल.

(२) नॉन स्ट्रायकरनें बॅट डाव्या हातांत धरून ' बॅटिंग् क्रीज् ' पाशीं उभें राहावें. (गोलंदाज ' राउंड दि विकेट ' टाकीत असेल तर अर्थात् ती बॅट उजव्या हातीं धरावी लागेल.) गोलंदाज चेंडू टाकीत असतांनांच नॉन-स्ट्रायकरनें धांव घेण्यास सुरवात करून दोनतीन यार्ड पुढें जावें. म्हणजें धांव काढण्याची संधी असेल तर त्यास चटकन् ती काढतां येईल.

(३) पलीकडील क्रीज्पाशीं पोंचतांना बॅट जमिनीसरपट घसरत न्या. तसें न करतां हवेंतून बॅट क्रीज्मध्यें ठेवल्यामुळें पुष्कळ फलंदाज धांवचीत होतात.

(४) दुसऱ्या किंवा तिसऱ्या धांवेची शक्यता असेल तर धांवतांना मागें वळून पाहूं नका. जोरानें धांवून प्रथम धांव पूर्ण करा. मग आपण परत धांवूं शकूं कीं नाहीं तें अजमावून ' कॉल ' द्या.

(५) धांव काढतांना अनिश्चितता किंवा धरसोड हा अक्षम्य गुन्हा आहे. धांव होणार नाहीं असें वाटल्यास सरळ ' नो ' म्हणून सांगा. त्यामुळें कदाचित् एक धांव कमी मिळेल पण विकेट विनाकारण जाणार नाहीं.

(६) आपल्या साथीदाराचा धांवण्याचा वेग लक्षांत घेऊन धांवा व त्याप्रमाणें ' कॉल ' द्या.

(७) क्षेत्ररक्षक कसे आहेत, धांवण्यांत जलद आहेत कीं मंद, त्यांचे ' थ्रो ' कसे आहेत आणि सर्वांत महत्वाचें म्हणजे ते डावरे आहेत किंवा काय हें नीट पाहून त्याप्रमाणें फलंदाजांनीं धांवा काढण्याचे ' कॉल ' द्यावेत.

अनुक्रम.......... विः ....
क्रमांक ७७ .... नों: दि: ....

(८) हीं सर्व पथ्यें पाळूनदेखील फलंदाज धांवचीत होतात व होतील. अशा वेळीं आपल्यापेक्षां चांगला फलंदाज धांवचीच होत असेल तर त्याच्याऐवजीं आपण धांवचीत होऊन त्याला वांचवावें. संघाच्या दृष्टीनें हें फायद्याचें व आवश्यक आहे.

१०

चला सामना खेळायला !

क्रिकेट कसें खेळावें याविषयीं आतांपर्यंत मुख्यतः तांत्रिक दृष्टीनें उहापोह केला. आतां सामना खेळतांना लक्षांत ठेवायच्या गोष्टींविषयीं येथें सर्वसाधारण विवेचन करीत आहें –

क्रिकेट खेळतांना पांढराशुभ्र, स्वच्छ शर्ट, पांढरी लाँग् पँट्, क्रिकेटचे पांढरे बूट, स्वच्छ पायमोजे आणि हॅट किंवा काउंटी कॅप. खिशांत एक स्वच्छ हातरुमाल किंवा नॅपकिन् ठेवा. इकडील हवेंत घाम फार येतो. तो परतपरत पुसला पाहिजे. अंगावरील कपडे गच्च नसावेत, साधारण ढिले (ज्याला इंग्रजींत ' लूझ फिटिंग् ' म्हणतात तसे) असावेत. अशा कपड्यांत चटकन् व सहज हालचाल करतां येते. कांहीं अग्रगण्य क्रिकेटपटू शर्टचीं बटनें न लावतां छाती उघडी टाकतात. त्यांचें कधींच अनुकरण करूं नका. त्यांचें तें करणें बरोबर नाहीं.

सामन्याची वेळ नीट लक्षांत ठेवा. खेळ सुरू होण्यापूर्वीं अर्धा तास आधीं मैदानावर हजर राहा. घाईघाईनें कपडे बदलण्याऐवजीं आरामांत कपडे बदलून बसल्यामुळें मनःस्थिति शांत व उत्तम राहाते. शिवाय, अमका आला नाहीं, तमका आला नाहीं अशी कर्णधारास काळजी करावी लागत नाहीं.

संघाचें हित सतत लक्षांत ठेवून खेळा; आप्पलपोटेपणा करूं नका! कर्णधाराच्या आदेशांचें तंतोतंत पालन करून खेळा. मग ते आदेश तुम्हांस पटोत वा न पटोत. कर्णधार हाच तुमचा नेता व सेनानी. त्याचें म्हणणें ऐकून तसें वागणें हेंच तुमचें कर्तव्य. या शिस्तीला फार महत्त्व आहे. कर्णधारावर कधींहि टीका करूं नका. संघाचे सर्व खेळाडू (कप्तानासकट) एकत्र बसून खेळाविषयीं चर्चा करतात त्यावेळीं तुमचें स्पष्ट मत अवश्य मांडा. पण कर्णधारानें एकदां निर्णय घेतला कीं तो अखेरचा समजून तो अंमलांत आणा.

पंचाचा (अंपायरचा) निर्णय तुम्हांस कितीहि चुकीचा वाटला तरी तो बंधनकारक मानून सरळ तंबूकडे चालायला लागा-- कोणत्याहि प्रकारचें 'निदर्शन, प्रदर्शन किंवा देखावा न करतां!' तुमचा सामन्यांचा अनुभव वाढत जाईल तसें तुम्हांस आढळून येईल कीं तुमच्या बाजूचे निकाल (अंपायरांचे) व तुमच्या विरुद्धचे निकाल यांची वजाबाकी शून्य येईल.

क्रिकेटचा खेळ दिवसाचे पांचसहा तास (उपाहार व चहा यांच्या सुटचा सोडून) प्रखर उन्हांत खेळला जातो. कधीं कधीं सतत तीनचार दिवसहि खेळला जातो. म्हणून ताकद (किंवा स्टॅमिना) टिकविण्याचें फार महत्त्व आहे. रोज नियमितपणें व्यायाम करणें व धांवण्याचा सराव करणें आवश्यक आहे. बरींच वर्षें क्रिकेट खेळून कीर्ति संपादन करायची असेल तर हें केलेंच पाहिजे. पोट सुटणार नाहीं याचीहि काळजी घेतली पाहिजे.

सामना जिंकण्याच्या ईर्षेनेंच खेळा. खेळांच्या नियमांनुसार व खिलाडू वृत्तीनें खेळून विजयासाठीं जेवढे प्रयत्न करतां येतील तेवढे जरूर करा. आशा सोडूं नका. हातपाय गाळून बसूं नका. पराभव झाला तरी पुढील खेपेला दसपट आवेशानें व कौशल्यानें खेळून विजयी होण्याचा निर्धार करा. पराजयाचा खिलाडू वृत्तीनें स्वीकार करून विजेत्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करा. आपल्या अपयशाची कारणमीमांसा, चिकित्सा जरूर करा, पण प्रतिस्पर्धी संघाच्या विजयास कमी लेखूं नका.

क्रिकेटमध्यें संघभावना (टीम स्पिरिट) या गोष्टीस फार महत्त्व आहे. सर्व खेळाडूंशीं एकदिलानें व खेळीमेळीनें वागा. थट्टामस्करी पुष्कळ खेळाडूंना आवडत नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवून त्यांच्याशीं वागा.

उत्तमोत्तम खेळाडूंचा खेळ काळजीपूर्वक बघा. मात्र त्यांचे चांगले फटके व चांगल्या संवयी यांचेंच अनुकरण करा. कारण, उत्कृष्ट क्रिकेटपटूंनांहि कांहीं वाईट संवयी असतात व त्यांचे कांहीं फटके सदोष असतात.

यशानें किंवा विजयानें हुरळून जाऊं नका. आपण आतां 'सबकुछ' बनलों, आपले हात गगनाला भिडले अशी 'ग'ची बाधा होऊं देऊं नका ! या खेळांत गर्व, अहंकार यांना जागा नाहीं. प्रत्येक खेळाडूस नेहमींच कांहींतरी नवीन शिकण्यासारखें असतें. तशी सतत तयारी हवी. त्यासाठीं आपले डोळे व कान नेहमीं उघडे पाहिजेत.

क्रिकेटविषयींचीं पुस्तकें लक्षपूर्वक वाचा. त्यांत तुम्हांस शिकण्यासारखें अवश्य कांहींतरी मिळेल. खेळांतील विशिष्ट मुद्यांविषयीं किंवा युक्त्यांविषयीं अनुभवी खेळाडूंशीं चर्चा करा, त्याचा उपयोग होऊन तुमचा खेळ सुधारेल.

अखेर, क्रिकेट हा एक खेळच आहे. त्यांत हारजीत, जयपराजय, यांच्या ऊनपावसाचा लपंडाव चालणारच. ‘कोणत्याहि व्यक्तीपेक्षां खेळ हा अधिक महत्त्वाचा’ हें अर्थपूर्ण सुभाषित मनावर कोरून ठेवा आणि आदर्श क्रिकेटपटु होण्यासाठीं सतत परिश्रम करा. ...

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठा. स्थळप्रत.
अनुक्रम 3२८२५ दि: ....
क्रमांक .... नों दि ....

● **** ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११८६६
स्थळ प्रत

बाउंडरी–चार

बाउंडरी–सहा

बाय

लेग् बाय

वाईड

नो बॉल

आउट

अेक कमी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
.... नों: दि: ....

REFBK-0011477
REFBK-0011477

आपण अब्बास अली बेग, 'टायगर' पतौडी, चंदु बोर्डे किंवा रमाकांत देसाई व्हावें आणि कसोटी क्रिकेटचें क्रिडांगण गाजवावें असें प्रत्येक युवकास तीव्रतेनें वाटत असते. परंतु क्रिकेटपटूंच्या त्या कीर्तीमार्गे केवढी दांडगी तपश्चर्या असते याची फारच थोडचा तरुणांना कल्पना असते............

क्रिकेट कसें खेळावें याविषयीं तरुण पिढीस मार्गदर्शन करू शकेल अशा प्रकारचें एक पुस्तक मराठींत लिहावें अशा आशयाचा विचार भारताचे भूतपूर्व अग्रगण्य कसोटी क्रिकेटपटु आणि मुंबई संघाचे पूर्वीचे विजयी कर्णधार श्री. माधव मंत्री यांच्या मनांत बरेच दिवस घोळत होता. कल्पक प्रकाशक श्री. वि. र. बाम यांनाहि अशा प्रकारच्या पुस्तकाची उणीव भासत होती. असें एखादें पुस्तक लिहावे अशी कल्पना कधींकधीं माझ्याहि मनांत डोकावून जाई. वीणा मासिकाचे संपादक व आम्हा तिघांचे स्नेही श्री. उमाकांत ठोमरे यांनीहि या कल्पनेचा जोरदार पुरस्कार केला. या सर्वातून या छोटेखानी पुस्तकानें जन्म घेतला.

हें पुस्तक वाचून कोणताहि शाळकरी मुलगा बेग, पतौडी, बोर्डे किंवा 'टायनी' रमाकांत बनूं शकेल असा दावा करणें निव्वळ हास्यास्पद ठरेल ! पण चांगला क्रिकेटपटू होऊ इच्छिणाऱ्या युवकास या पुस्तकाचा निश्चित् उपयोग होईल असा विश्वास वाटतो. तेवढे झालें तरी आमचे श्रम सार्थकीं लागले एवढें समाधान आम्हांस वाटेल.......

वसंत स. पोरेडी